४५वा वार्षिक अहवाल
२०१४ - २०१५



शहर व औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित

महाराष्ट्र शासनाचा उपक्रम

नोंदणीकृत कार्यालय:
'निर्मल'
दुसरा मजला,
नरीमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी: ६६५० ०९००

अनुक्रमणिका

अनु. क्र.		पृष्ठ क्र.
१.	संचालकांचा अहवाल	१
२.	लेखा परिक्षकांचा अहवाल	५२
३.	ताळेबंद	६२
४.	नफा-तोटा विवरण	६४
५.	रोख ओघ विवरणपत्र	६५
६.	लेखांकनाचा भाग असणाऱ्या टिप्पण्या	६६
७.	लेखांकनावरील भारतीय नियंत्रक व महालेखापरीक्षकांची टिप्पणी	११६
८.	नवी मुंबई प्रकल्प लेखा (सविस्तर)	११९
९.	नवी मुंबई प्रकल्पाकडे हस्तांतरित केलेल्या महसुली खर्चाचा तपशील	१५०
१०.	नवीन शहरे प्रकल्प लेखा	१५३
११.	तारापूर प्रकल्प लेखा	१५८
१२.	नयना प्रकल्प लेखा	१५९
१३.	चिखलदरा प्रकल्प लेखा	१५९
१४.	महाटुरीझम कॉर्पोरेशन लिमिटेडचा वार्षिक अहवाल	१६१

संचालक मंडळ ३१-०३-२०१५ अनुसार

संचालक मंडळ	श्री. संजय भाटीया श्रीमती व्ही. राधा	उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक सह व्यवस्थापकीय संचालिका
	संचालक श्री. प्रमोद हिंदुराव श्री. एम. के. श्रीवास्तव श्री. नामदेव भगत श्री. वसंत भोईर श्री. यु.पी.एस. मदन श्री. एस. के. सिंग श्री. मोपालवार श्री. ए.एल.जऱ्हाड	**संचालक** श्री. एन. एन. कुमार श्री. आर. सी. घरत श्री. नितीन करिर श्रीमती मनिश पाटणकर-म्हैसकर श्री. दिनेश वाघमारे श्री. निराज बंसल श्री. सुनिल केंद्रेकर
कंपनी सचिव	श्री. प्रदीप रथ	
नोंदणीकृत कार्यालय	निर्मल, दुसरा मजला, नरीमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१.	
दुय्यम कार्यालये	**सिडको भवन** सी.बी.डी. बेलापुर नवी मुंबई - ४०० ६१४	**वाशी** जिल्हा - ठाणे नवी मुंबई - ४०० ७०३
	रायगड भवन सेक्टर-११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४	**वसई-विरार** अंबिका कमर्शियल कॉम्प्लेक्स, दुसरा मजला, वसई (पूर्व), जि. ठाणे
	औरंगाबाद उद्योग भवन, एम.आय.डी.सी. औद्योगिक वसाहत, चिखलठाणा, औरंगाबाद ४३१ ००३.	**तारापूर** एम.आय.डी.सी. औद्योगिक वसाहत, बोईसर, जि. ठाणे
	नांदेड टेक्सोम एरीया, नांदेड.	**नाशिक** ॲडमिनिस्ट्रेटिव्ह बिल्डिंग, मुंबई-आग्रा रोड, नाशिक-४२२००९
	ओरोस ता. कुडाळ जिल्हा - सिंधुदुर्ग	**नागपूर** भिवापूरकर चेंबर्स, ४ था मजला, यशवंत स्टेडियमच्या समोर, धंतोली, नागपूर - १२.
बँकर्स	सेंट्रल बँक ऑफ इंडिया स्टेट बँक ऑफ इंडिया युटीआय बँक बँक ऑफ महाराष्ट्र बँक ऑफ इंडिया दि रायगड डिस्ट्रीक्ट सेंट्रल को. ऑप. बँक लि.	इंडियन ओव्हरसीज बँक युनियन बँक ऑफ इंडिया स्टेट बँक ऑफ म्हैसूर विजया बँक पंजाब नॅशनल बँक
सॉलिसीटर्स	मे. लिटल अँड कं. सेंट्रल बँक बिल्डिंग, फ्लोरा फाऊंटन, मुंबई - ४०० ००१.	मे. पूर्णानंद अँड कं. फोर्ट चेंबर सी, ६५, टॅमरिंड लेन, फोर्ट, मुंबई - ४०० ०२३.
लेखा परीक्षक	मेसर्स कैलाश चंद जैन आणि कंपनी सनदी लेखापाल एडेना, १ला मजला, ९७ महर्षी कर्वे रोड, आयकर कार्यालयाजवळ, मुंबई ४०० ०२०.	

संचालकांचा अहवाल

भागधारकांसाठी दिनांक ३१ मार्च, २०१५ रोजी संपलेल्या वर्षापर्यंतचा संचालकांचा अहवाल

दिनांक ३१ मार्च, २०१५ रोजी संपलेल्या वर्षापर्यंतच्या लेखापरिक्षण केलेल्या लेखांकनासह महामंडळाची प्रवर्तने आणि उद्दीष्टे साध्य करण्यावरील ४५ वा वार्षिक अहवाल सादर करताना आपल्या संचालकांना अतिशय आनंद होत आहे.

आपल्या कंपनीने भारतातील प्रमुख शहर नियोजन आणि विकास प्राधिकरण म्हणुन आपले स्थान कायम ठेवलेले आहे, हे ऐकुन आपल्याला अतिशय आनंद होईल.

आम्हाला याचा उल्लेख करण्यास अभिमान वाटतो की, नॅशनल जॉग्रफिक या वाहीनेने नवी मुंबईची जागतिक ६ सर्वोत्तम शहरांमध्ये गणना केलेली आहे. आणि या वाहीनीनुसार नवी मुंबई हे भारतातील पायाभूत सुविधा बांधकाम, विकास आणि परिवहन यांच्या दृष्टीने अतिशय सुनियोजित असे एकमेव शहर आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर रचना अधिनियम १९६६ (एमआरटीपी) अधिनियम) चे कलम ११३ (३ ए) सहवाचता कलम ११३ (३ ए) आणि ४०१ (१) (बी) च्या तरतुदी आणि महाराष्ट्र शासनाने जारी केलेले विविध शासन निर्णय (जी आर) आणि अधिसूचना या नुसार नवीन शहर विकास प्राधिकरण आणि विशेष नियोजन प्राधिकरण म्हणुन कामे पार पाडण्याच्या दृष्टीने आपल्या महामंडळाची नवी मुंबई क्षेत्राचा विकास करण्यासाठी एमआरटीपी अधिनियम १९६६ (एमआरटीपी अधिनियम) चे कलम ११३ (३ ए) अन्वये नवीन शहर विकास प्राधिकरण म्हणुन आणि अन्य अधिसूचित क्षेत्राचा विकास करण्यासाठी कलम ४० (एक) (बी) अन्वये विशेष नियोजन प्राधिकरण म्हणुन नेमणुक करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र राज्य शासनाच्या वतीने शासनावरील प्रशासन विभागाच्या आणि नगर विकास विभागाच्या अनुक्रमे दिनांक २० मार्च १९७१ आणि दिनांक १६ ऑगस्ट १९७३ रोजीच्या अधिसूचनेनुसार ठराव क्र. (भा. नि. क्र.) आयडीएफ ५७७० /आय एनडीएल दिनांक १८ मार्च १९७० सा.नि.क्र.सी.आयडी - २०७२ यु. दिनांक २४ जानेवारी १९७२ शा.नि.क्र.सी.आयडी - २०७० यु दिनांक ११ जानेवारी १९७४ आणि शा.नि.क्र.सीआयडी -२०८४/१३२०/सी आर -१६१/८४/युडी-४ दिनांक २ जानेवारी १९८५ अन्वये सिडकोमार्फत नवी मुंबई प्रकल्प विकसित करण्यात येत आहे. त्यानुसार महामंडळ महाराष्ट्र शासनाचा एक अभिकर्ता म्हणुन काम करीत आहे.

वित्तिय संक्षेप किंवा ठळक वैशिट्ये / कंपनीची कामगिरी

कंपनीच्या दिनांक ३१ मार्च २०१५ रोजी संपलेल्या वर्षापर्यंतच्या वित्तिय निष्कर्षाचा संक्षेप खालीलप्रमाणे देण्यात आलेला आहे.

(रुपये लाखात)

	२०१४-१५	२०१३-१४
व्याज, घसारा आणि आयकर यापुर्वीची शिल्लक	५	५
वजा : व्याज	०	०
प्रवर्तित शिल्लक/(तुट)	५	५
वजा : घसारा	०	०
वजा : आयकर	०	०
व्याज, घसारा आणि आयकर यानंतरची शिल्लक / (तुट)	३.४५	५
अधिक : मागील वर्षाची पुढे अग्रेषित केलेली शिल्लक	२१७.००	२१२
ताळेबंदामध्ये दिलेली शिल्लक	२२०.४५	२१७

वर नमुद केल्याप्रमाणे वित्तिय कामगिरीवरून असे दिसून येते की, सर्व खर्चाची पुर्ती झाल्यानंतर महसूली लेखांकनामध्ये या वर्षी रू.३.४५लाखाची निव्वळ तुट दिसून येते.

कामांचा आढावा

नवी मुंबई प्रकल्प :-

प्रस्तुत वर्षात आपल्या घरांसाठी असलेली वाढती मागणी भागविण्याकरीता आपण यशस्वीरित्या आपल्या कामाची गती वाढविली आणि नवीन प्रकल्पांच्या बाबतीत पुरेशा प्रमाणात पायाभुत सोयींमध्ये वाढ केली.

उत्पन्न :-

विक्रीचे प्रभावी तंत्र व त्याबरोबरच उंचावलेली उत्पादन प्रतिमा आणि महसुल संकलन प्रक्रीयांच्या पुनर्रचनेमध्ये केलेली आणखी प्रगती यामुळे मागील वित्तिय वर्ष हे महसूली कामगिरीच्या बाबतीत आणखी एक उद्वर्धनशिल वर्ष ठरले. मागील वर्षाच्या कामगिरीवरून दिसून येते त्यानुसार सिडकोने विविध पैलू असलेल्या प्रकल्पांची अंमलबजावणी तसेच महसुली उत्पन्नाची निर्मिती या बाबतीत वेगाने वाढ करण्याची आपली गती सातत्याने कायम ठेवली आहे. सिडकोने रू. ३७८९.२० कोटी इतक्या लक्षाच्या तुलनेत रू. २५६०.४८ कोटी इतके एकुण महसुली उत्पन्न निर्माण करून ६८ % कामगिरी प्रस्थापित केलेली आहे. आपल्या जुन्या घरांच्या साठ्यातील बव्हंश घरांची आपण विक्री केलेली आहे.

विक्रीतुन मिळालेले उत्पन्न :-

आर्थिक वर्षांदरम्यान रू. २४०७.७९ कोटी इतक्या अर्थसंकल्पिय लक्षाच्या तुलनेने रू. १२३९.४७ कोटी इतका विक्रीतुन महसुल प्राप्त झाला होता. व ५१.४८% कामगिरी प्रस्थापित झाली होती. भूखंड, बांधकाम केलेल्या सदनिका आणि दुकाने यांच्या विक्रीतुन अनुक्रमे रू. ९८.०४ कोटी आणि रू. ७७५.९४ कोटी उत्पन्न मिळाले.

कर्जे :-

मागील पाच वर्षांमध्ये आपण स्वयंवित्त व्यवस्था असलेल्या गृहनिर्माण योजनांचा अवलंब करून आपण आपल्या कर्जाचे प्रमाण अगदी किमान मर्यादेपर्यंत कमी केलेले आहे. पुनर्विलोकनाखालील वर्षांमध्ये महामंडळाने बँका किंवा वित्तिय संस्था यांच्याकडुन कोणतेही मुदती कर्ज घेतलेले नव्हते.

अदत कर्जे :-

कर्जाची परतफेड व त्यावरील व्याजाचा बोजा या दाखल असणारे महामंडळाचे बांधिल दायित्त्व कमी करण्यात आपण बरेच यशस्वी झालो आहोत. तसेच या ठिकाणी असे नमुद करायवयास हवे की दिनांक ३१ मार्च २००० रोजी रू १२९० कोटी इतके असणारे महामंडळाचे एकुण अदत्त कर्ज ३१/३/२००० रोजी रू १३.७१ कोटी पर्यंत कमी झाले. यावरून या कालावधीत आपण रू १,२७६.२९ कोटी इतक्या कर्जाची परतफेड केली असल्याचे दिसून येते.

मार्च २००० पासून वर्षवार अदत्त कर्जाऊ रक्कमांची शिल्लक खाली देण्यात आलेली आहे :-

मार्च, २०००	-	१२९० कोटी रूपये
मार्च, २००१	-	११३६ कोटी रूपये
मार्च, २००२	-	१०१० कोटी रूपये
मार्च, २००३	-	७८६ कोटी रूपये
मार्च, २००४	-	४७९ कोटी रूपये
मार्च, २००५	-	२५९ कोटी रूपये
मार्च, २००६	-	२४५ कोटी रूपये

मार्च, २००७	-	२३३ कोटी रूपये
मार्च, २००८	-	१६९ कोटी रूपये
मार्च, २००९	-	१३८ कोटी रूपये
मार्च, २०१०	-	७९ कोटी रूपये
मार्च, २०११	-	३१ कोटी रूपये
मार्च, २०१२	-	२६ कोटी रूपये
मार्च २०१३	-	१९ कोटी
मार्च २०१४	-	१६ कोटी
मार्च २०१५	-	१४ कोटी

खर्च :-

खर्चाच्या बाबतीत काटकसरीच्या अनेक उपाययोजना अवलंबण्यात आल्या. आपल्या दुरदर्शी व जबाबदार धोरणामुळे कार्यालय क्षेत्रात आमूलाग्र बदल झालेला आहे. आणि त्यामुळे महामंडळाच्या वित्तीय कामगिरीत लक्षणीय सुधारणा झालेली आहे. प्रस्तुत वर्षात झालेला एकुण भांडवली खर्च रू. २११०.५१ कोटी इतका होता. आपण घणसोली, खारघर, कामोठे, उलवे, आणि नविन पनवेलमध्ये पायाभूत सोयींच्या स्वरूपातील मत्ता निर्माण केलेल्या आहेत व त्यामुळे पुढील पाच वर्षांमध्ये अधिक महसुली उत्पन्न मिळेल. अतिरिक्त कर्ज न घेता आपण आपली सर्व कामे चालू ठेवू शकलो आहोत. १२.५% भूखंडाच्या वाटपाचा अनुशेष भरून काढणे सुकर व्हावे यासाठी १२.५% योजने अंतर्गत पायाभूत सोयी विकसित करण्यावर विशेष भर देण्यात आलेला आहे.

भांडवली आणि महसुली या दोन्ही क्षेत्रातील खर्चावर विवेकपुर्वक नियंत्रण ठेवण्यासाठी शक्य असेल तेथे काटकसरीच्या उपाययोजनांचा अवलंब करण्यात आलेला आहे. त्याची निष्पती म्हणजे गेल्या ६ वर्षात महमंडळाच्या वित्तिय कामगिरीत लक्षणीय सुधारणा झालेली आहे.

या वर्षादरम्यान रू. ३,९११८.२८ कोटी इतक्या अर्थसंकल्पिय लक्षाच्या तुलनेने एकुण खर्च रू. २,६१८.७६ कोटी इतका झाला होता. सिडकोने मुद्रण, लेखनसमाग्री, वाहन भत्ता यासारख्या प्रशासनावरील खर्चावर आणि इतर प्रशासकीय खर्चावर सर्व बाजुंनी नियंत्रण ठेवलेले आहे. यामुळे मागील वर्षादरम्यान महामंडळाच्या एकंदर प्रशासकीय खर्चामध्ये लक्षणीय घट झालेली आहे.

प्रत्यक्ष कामगिरीचा आढावा

१. गृहनिर्माण क्षेत्र

घरांची विक्री

परवडण्यायोग्य किंमतीची दर्जेदार घरे बांधणे हे महामंडळाचे एक महत्वाचे वैशिष्ट्य आहे. सिडकोने मार्च २०१५ पर्यंत नवी मुंबईत १,२३,६४० घरे बांधली आहेत. यापैकी २९% घरे आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक/अल्प उत्पन्न गट यांच्यासाठी २८% घरे मध्यम उत्पन्न गटासाठी आणि २१% घरे उच्च उत्पन्न गटासाठी आहेत.

घराचा प्रकार	घरांची संख्या
बीयुडीपी	२४,६५३
आर्थिक दृष्टया दुर्बल घटक आणि अल्प उत्पन्न गट (२५ चौ. मी. पर्यत)	३६,२३०
मध्यम उत्पन्न गट (२६ चौ. मी. ते ५० चौ.मी)	३४,४२३
उच्च उत्पन्न गट (५० चौ.मी. च्या वर)	२६,१०६
अनिवासी भारतीय	१,५३६
सीवुड्स	६९२
एकूण	१,२३,६४०

या घरांव्यतिरिक्त खारघर सेक्टर ३६ येथे आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांसाठी सुमारे ९६८ घरांचे, अल्प उत्पन्न गटासाठी सुमारे २६२२ घरांचे, मध्यम उत्पन्न गटासाठी ८०२ घरांचे आणि उच्च उत्पन्न गटासाठी सुमारे ४२२ घरांचे आणि सीवुड्स येथे १८४ घरांचे बांधकाम सुरू आहे. गृहनिर्माण प्रकल्पाचे खालील प्रमाणे सविस्तर वर्णन करण्यात आलेले आहे :-

अ) नेरूळ येथील सेक्टर ५४, ५६ आणि ५८(भाग) मधील सीवूड्स इस्टेट फेज-२ गृहनिर्माण योजना:-

या गृहनिर्माण योजनेचे नोंदणीकरण उच्च उत्पन्न गटासाठी असणाऱ्या सदनिकांकरीता पार पाडण्यात आले होते. सीवूड्स फेज-२ गृहनिर्माण प्रकल्पांमध्ये १७ इमारती आणि १८ दुकानांचा समावेश आहे. या स्टील्ट + १८ मजली इमारतींमध्ये ८७६ सदनिकांचा समावेश असुन या सदनिकांचे बांधकामाखालील क्षेत्र १२७५ चौ. फुट ते २७६० चौ. फुट यांच्या दरम्यान आहे. या प्रकल्पामध्ये अति जलद उद्वाहके, निसर्गरम्य बगिचे, आधुनिक सुरक्षा आणि संदेशवहन यंत्रणा आणि पाईपलाईनद्वारे गॅस पुरवठा इत्यादी सोयी असतील. मेसर्स आयव्हीआर सीएल इन्फ्रास्ट्रक्चर अँड प्रोजेक्ट लि. यांना देण्यात आलेले एकुण रू.९१.०० कोटी इतक्या खर्चाचे ४००० सदनिकांचा समावेश असणारे ७ इमारतींचे काम दिलेल्या मुदतीमध्ये पुर्ण करण्यात आलेले आहे. आणि सदनिकांचा ताबा देण्याचे काम सुरू आहे.

वर्ष २०१४-१५ च्या दरम्यान रू. १३.०९ कोटी इतक्या अर्थसंकल्पिय तरतुदीनुसार रू. १३.०९ कोटी इतक्या अर्थसंकल्पिय तरतुदीनुसार रू १७.३६ कोटी इतका खर्च झालेला होता. हे काम वास्तविकपणे पुर्ण झालेले असुन सदनिकेचा ताबा देण्याची प्रक्रीया सुरू आहे.

ब) सामुहीक गृहनिर्माण योजना, सेक्टर -१६ आणि १७ खारघर :-

महामंडळाने सेक्टर -१६ आणि १७, खारघर येथे खालीलप्रमाणे गृहनिर्माण योजना हाती घेतलेली आहे:-

अ.क्र.	प्रकार	इमारतींची संख्या	सदनिकांची संख्या	बांधकामाखालील क्षेत्र (चौ.मी.)	एकूण बांधकामाखालील क्षेत्र (चौ.मी.)
१.	केएच-१(एस + ४)	३९	६२४	२८.०५	१७,५०२.८१
२.	केएच-२(एस + ४)	३२	५१२	४०.९२	२०,९५०.०८
३.	केएच-३(एस + ७)	१७	४७६	५६.६२	२६,९५१.१२
४.	केएच-४(एस + ७)	१९	५३२	९५.७९	५०,९६०.२८
	एकूण	**१०७**	**२,१४४**		**१,१६,३६४.२९**

मेसर्स बी. जी. शिर्के सीटीपीएल यांना कंत्राटदाराच्या पुर्वरचित संरचनात्मक घटकांसह कंत्राटदारांच्या स्वत:च्या संकल्पचित्राच्या आधारे रू. १,३७६ प्रती. चौ.फुट बांधकामाखालील क्षेत्र याप्रमाणे रू. ५,६९३.२४ लाखाचे के एच- १ आणि के एच-२ प्रकारच्या सदनिकांचे बांधकामाचे कंत्राट ठराव क्र. ९,७५५ दिनांक १५.११.२००७ अनुसार देण्यात आलेली आहे. पुन: प्रापणाच्या कामासाठी केएच -१ आणि केएच-२ ची अनुक्रमे रू. ४०१.३९ लाख आणि रू. ९०.४३ लाख इतक्या खर्चाची ऑनसाईट व ऑफसाईट विकास कामे देखिल मेसर्स बी.जी. शिर्के सीटीपीएल यांनाच देण्यात आलेली आहेत.

दिनांक १८.१२.२००७ रोजीचा ठराव क्र. ९,७७० अनुसार १,४५५ प्रती.चौ. फुट बांधकाम केलेल्या क्षेत्राच्या भारीत सरासरी दराने रू. १२,२०२.१८ लाखाचे के एच -३ आणि के एच -४ प्रकारच्या सदनिकांचे कंत्राट देखिल मेसर्स बी. जी. शिर्के सी टी पी एल यांना प्रदान करण्यात आलेले आहे. तसेच सेक्टर १७ मधील के. एच तीन आणि के एच-चार प्रकारच्या सदनिकांची रू. ९९७.०४ लाखाची ऑनसाईट विकासकामे आणि के एच-चार प्रकारच्या सदनिकांची रू. ३८०.७३ लाखाची ऑफसाईट विकासकामे देखिल याच एजन्सीला देण्यात आली आहेत.

वर्ष २०१४-१५ साठी अर्थसंकल्पामध्ये केलेल्या रू. ०.१५ कोटीच्या तरतुदीनुसार नगण्य खर्च झालेला असुन चालु असलेली कामे या वर्षादरम्यान पुर्ण करण्यात आलेली आहेत.

२. नवी मुंबई अर्बन हाट :-

सिडको कलाग्राम (अर्बन हाट) सेक्टर ११, सीबीडी बेलापुर येथील सीबीडी बेलापुर रेल्वे स्थानकाच्या समोर असलेल्या टेकडीवर ४.७७ हेक्टर परिसरावर बसलेले आहे. या कलाग्राममध्ये वाहनतळ क्षेत्र आणि पदपथाचे क्षेत्र अनुक्रमे ५६७५ चौ. मीटर आणि ४२९५चौ मीटर इतके आहे.

सिडको कलाग्राम मध्ये प्रत्येकी दहा (१०) दुकानांचा (प्रत्येक दुकानाचे क्षेत्रफळ १०' × २०' = २०० चौ. फुट) एक समुह असे एकुण पाच (५) समुह असुन या ठिकाणी सार्वजनिक वापरासाठी प्रत्येक समुहामध्ये फुड प्लाझा, ॲम्फी थिएटर आणि प्रदर्शन हॉल, पेय जल, कारंजी आणि प्रसाधन गृहे इत्यादींची तरतुद करण्यात आलेली आहे.

भारताच्या वेगवेगळ्या भागातुन आलेल्या कारिगरांच्या सोयीसाठी पाणी आणि विद्युत पुरवठा २४ × ७ असा राहणार आहे. या ठिकाणी वर्षभर विविध हस्तशिल्पे, हातमाग, खादी आणि राज्य प्रवर्तनात्मक उत्सव भरविण्यात येतात. भारताच्या कानाकोपऱ्यातुन लोक या ठिकाणी येत असतात. नागरी कलाग्रामसाठी प्रत्येक वर्षाचा देखभाल खर्च १०० लाख रुपये आहे.

३. मेसर्स एनएमएसईझेड यांनी विकसित करावयाचे भूखंड:-

मेसर्स नवी मुंबई सेझ प्रा.लि. या कंपनीला द्रोणागिरी, कळंबोळी आणि उलवे प्रभागामध्ये १८४२ हेक्टर जागा भाडेपट्टयावर देण्यात आलेली आहे. हे काम प्रगतीपथावर आहे. तथापि, कंपनी दिलेले विकासात्मक उद्दिष्ट पुर्ण करू शकली नाही.

कंपनीने विकासात्मक उद्दिष्ट वेळेच्या आधी गाठण्यासाठी आणखी मुदत वाढ घेतली आहे. या दृष्टीने आणि कंपनी व सिडको हे दोघेही याबाबतीत असमर्थ ठरल्यामुळे शासनापुढे कंपनीची प्रकरणे सादर करताना सिडकोने कोणती भूमिका घ्यावी, यासाठी कायदेतज्ञ श्री. व्ही.सी. दागा (सेवानिवृत्त, न्यायाधिश, उच्च न्यायालय) यांच्याकडून त्यांचा अभिप्राय मागविण्यात आला. त्यांच्या मते काही बाबतीत सिडको /महाराष्ट्र शासन यांच्याकडून कसुर झालेली असल्यामुळे करार भंगासाठी सिडकोने न्यायालयामध्ये जाऊ नये असे त्यांनी सूचविले. त्याच प्रमाणे त्यांनी सिडकोला असा सल्ला दिला की, महाराष्ट्र सेझ अधिनियम नव्याने अधिनियमित करण्याकरीता सिडकोने उद्दीष्ट प्राप्तीसाठी मुदत वाढ प्रदान करावी.

महाराष्ट्र औद्योगिक धोरण, २००३च्या घोषणेच्या परिणामी कंपनीने सिडकोशी संपर्क साधुन या नव्या धोरणाचा लाभ घेण्याची आपली इच्छा व्यक्त केली. या धोरणातील तरतुदीनुसार महाराष्ट्रातील बंद झालेले सेझ अधिसूचित न करता स्वत:कडे वर्ग करावे आणि एकात्मिकृत औद्योगिक क्षेत्रामध्ये रूपांतरीत करावे. या बाबतीत आवश्यक ते निर्देश देण्याची महाराष्ट्र शासनास विनंती करण्यात येत आहे. सेझ पासुन आय आय ए पर्यंत प्रस्तावित केलेल्या स्विच ओव्हरच्या दिशेने सिडकोने पुढे पाऊल टाकावे असे सूचविले.

४. १२.५ टक्के योजनेखाली जमिनीचे वाटप:-

१२.५ टक्के योजनेखाली राखुन ठेवण्यात आलेल्या जमिनीच्या बाबतीत भौतिक स्वरूपाच्या पायाभूत सोयी विकसित करण्यास आणि तिचे प्रकल्पग्रस्त व्यक्तींना शीघ्र गतीने वाटप करण्यास सर्वाधिक प्राधान्य देण्यात आलेले आहे. आतापर्यंत सिडकोने प्रकल्पग्रस्त व्यक्तींना मार्च, २०१५ पर्यंत ७५५.३२ हेक्टर जमिनीचे वाटप कलेले असुन त्यातील बहुतेक जमिनीचे संगणक सोडतीद्वारे वाटप केलेले आहे. सुमारे ३६,११७ लाभाधिकाऱ्यांना याचा लाभ मिळालेला आहे. सन २०१४-१५ या वर्षात एकुण ३५.४६ हेक्टर भूखंडाचे वाटप केलेले आहे. २०१४-१५ वर्षादरम्यान वाटप प्रक्रीया अधिक सुलभ करण्यात आली. क्षेत्र निहाय पुस्तिका तयार करण्यात आल्या व त्यामध्ये लेआऊटचे नकाशे आणि सोडतीनंतर प्रत्येक प्रकल्पग्रस्त व्यक्तीस वाटप करण्यात यावयाच्या जागा दर्शविण्यात आल्या. १२.५ टक्के योजनेखाली वाटप करण्यात आलेल्या क्षेत्रात पुरविल्या जाणाऱ्या पायाभूत सोयी वसाहतीमधील पायाभूत सोयींप्रमाणे असतील. पायाभूत सोयींचा दर्जा सुधारण्यासाठी भूखंड मालकांवर प्रत्येक चौ. मीटरला रू. १०००/- इतकी रक्कम आकारण्याचा निर्णय घेण्यात आला. प्रस्तुत वर्षादरम्यान १२.५ टक्के योजने अंतर्गत क्षेत्रासाठी पायाभूत सुविधा पुरविण्याच्या कामांवर रू. १२५.२९ कोटी इतका एकुण खर्च झाला.

५. सामाजिक सुविधा भूखंड :-

बहुतांश मान्यवर व विख्यात शैक्षणिक संस्थांना नवी मुंबईत भूखंड देण्यात आलेले आहेत. मार्च २०१६ पर्यंत सिडकोने शैक्षणिक संस्था तसेच धार्मिक, सामाजिक आणि समाज कल्याण अशा विविध संस्थांना ५९९ भूखंड दिलेले आहेत. सन २०१५-१६ या वर्षादरम्यान सिडकोने विविध प्रकारच्या सामाजिक सोयींकरीता १८ भूखंडांचे वाटप केलेले आहे आणि नवी मुंबईतील विविध प्रभागांमध्ये ३२,७१९.७१ चौ. मीटर क्षेत्राचे वाटप केलेले आहे.

सन २०१५-१६ या वर्षादरम्यान वाटप केलेल्या भूखंडांचा तपशिल खाली देण्यात आलेला आहे. या वाटपातून एकूण १०.६४ कोटी रुपयांचा महसुल मिळाला.

अनु क्र	भूखंडाचा वापर	एकूण भूखंड
१	हॉस्टेल	-
२	सामाजिक सुविधा	१
३	शैक्षणिक	६
४	पोलिस विभाग	१
५	धार्मिक	१०
	एकूण	**१८**

विकल्या न गेलेल्या व्यापारी जागांची विक्री:-

रेल्वे स्थानकावरील दुकाने व कार्यालयीन जागा:-

रेल्वे स्थानकावर व्यापारी संकुले विकसित करण्याचा मुख्य उद्देश केवळ उत्पन्नाचा ज्यादा स्त्रोत निर्माण करणे हा नव्हता तर या व्यापारी संकुलामध्ये रोजगार, उत्पन्न निर्मिती या सारख्या आर्थिक कार्य व्यवहारात आणि सहाय्यभूत कार्यव्यवहारात वाढ करुन नवी मुंबईचा आर्थिक पाया मजबुत करणे हा देखिल होता. विक्रीच्या सुधारीत धोरणामुळे चांगली फलनिष्पत्ती झालेली आहे. आणि विक्री न झालेल्या अनेक जागांची त्यामुळे विक्री झालेली आहे. प्रस्तुत वर्षी महामंडळाने विक्री न झालेल्या उर्वरित जागांची विक्री करण्याचे मार्ग शोधण्याचा देखिल प्रयत्न केलेला आहे. आणि सानपाडा स्थानक संकुलामध्ये उदवाहनांची तरतुद करण्याचा निर्णय घेतला असून त्यामुळे दुसऱ्या व तिसऱ्या मजल्यावरील विक्री न झालेल्या जागांची विक्री करण्यास मदत होईल. विक्री न झालेल्या जागांची विक्री करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहेत.

प्रस्तुत वर्षी लक्षणीय आर्थिक वाढ झालेली आहे. आणि बाजारभावानुसार जास्तीत जास्त उत्पन्न मिळविण्यासाठी भाव वाढ करण्यात आलेली आहे. उत्पन्नाच्या बाबतीत महामंडळाला सानपाडा, जुईनगर, नेरूळ आणि आयआयपी, वाशी येथील स्थानक संकुलांचे ०.७२ कोटी रुपये उत्पन्न मिळालेले आहे.

प्रभागातील पायाभुत सोयी :-

प्रस्तुत वर्षी महामंडळाला प्रभागांमध्ये विविध पायाभूत सोयी पुरविण्यासाठी रू.२०८.९२ कोटी इतका खर्च झालेला आहे, ज्याचा संक्षेप खालीलप्रमाणे देण्यात आलेला आहे :-

अनु. क्र.	प्रभाग	एकुण खर्च (रू. कोटीमध्ये)
१.	ऐरोली	०.०४
२.	घणसोली	०.५१
३.	कोपरखैरणे	०.००
४.	वाशी	२१.३५
५.	सानपाडा	०.८३
६.	नेरूळ	२.८६
७.	बेलापुर	०.६०
८.	उलवे	३२.७०
९.	खारघर	७०.८३
१०.	कामोठे	४.४६
११.	कळंबोली	४३.६७
१२.	पनवेल	८.२६
१३.	द्रोणागिरी	१८.८१
१४.	तळोजा	४.००
	एकुण	२०८.९२

हेटवणे पाणी पुरवठा योजना :

नवी मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ आणि जीवन विकास प्राधिकरण यांनी विकसित केलेल्या धरणातुन सध्या नवी मुंबईला पाणी पुरवठा करण्यात येतो. आपली स्वत:ची खात्रीशिर अशी पाणी पुरवठा योजना असावी या उद्देशाने, महाराष्ट्र शासनाच्या पाटबंधारे विभागाकडून बांधण्यात आलेल्या हेटवणे धरणाच्या आधारे १०० दशलक्ष लिटर पाण्याचा साठा राखुन ठेवण्यात आला. जल प्रक्रीयेच्या समावेशासह पारेषण कार्यपध्दतीची सन १९९० मध्ये आखणी करण्यात आली आणि सन १९९२ मध्ये निविदा काढण्यात आल्या. ही योजना सन २००१ मध्ये पुर्ण करण्यात आली आणि सप्टेंबर, २००२ मध्ये कार्यान्वित करण्यात आली. नवी मुंबईला १५० दशलक्ष लिटर पाणी पुरवठा करण्यासाठी या योजनेची आखणी करण्यात आलेली आहे. तथापि सध्या राखीव साठ्यानुसार फक्त १२० दशलक्ष लिटर पाण्याचा पुरवठा केला जातो.

केआयडीसीने सन २०१४ मध्ये सिडकोला कायम स्वरुपामध्ये १०० दशलक्ष लिटर पाण्याचा पुरवठा केलेला आहे. तसेच सिडकोला आणखी ५० दशलक्ष लिटर पाण्याचा दिनांक १ एप्रिल २०१५ पासुन पुरवठा करण्याची मंजुरी देण्यात आलेली आहे. या संबंधात सिडको आणि केआयडीसी मध्ये दिनांक २३ मार्च, २०१५ रोजी करार झालेला आहे. संचालक मंडळाने ठराव क्र.११२३२ दि.०२/१२/२०१४ द्वारे कायमस्वरूपी अतिरिक्त ५० दशलक्ष लिटर पाणी राखुन ठेवण्यासाठी भांडवली अंशदानाचे १४८.८१ कोटी रुपये केआयडीसीला प्रदान करण्यास मान्यता दिलेली आहे.

हेटवणे धरणातुन पाणी खेचुन त्यावर जिते येथील नळ शुद्धीकरण केन्द्रामध्ये प्रक्रीया केली जाईल. हे जलशुद्धीकरण केन्द्र हेटवणे धरणापासुन १८.८ किमीवर आहे. त्यानंतर हे पाणी मार्गावरील ६९ गावांसह नवी मुंबईतील द्रोणागिरी, उलवे आणि खारघर प्रभागांना पुरविले जाईल. वहन यंत्रणेची एकुण लांबी ५२ किमी आहे.

खारघर, पनवेल, कळंबोली, कामोठे, द्रोणागिरी आणि उलवे प्रभागांची पाण्याची मागणी सन २०२१ पर्यंत ५०० दशलक्ष लिटर इतकी वाढेल. आपण पनवेल, कळंबोली आणि कामोठे प्रभागासाठी एमजेपी आणि नवी मुंबई महानगर पालिकेकडून पाणी उसने घेऊन पाण्याची गरज भागवित आहोत. भविष्यातील सन २०२५ मधील ७०० दशलक्ष लिटर पाण्याची गरज भागविण्यासाठी सिडकोने ३५० दशलक्ष लिटर क्षमतेचा बाळगंगा धरण प्रकल्प हाती घेतलेला आहे.

बाळगंगा धरण प्रकल्प :

महाराष्ट्र शासनाने बाळगंगा धरणाचे बांधकाम सन १९९० मध्ये सिडकोकडे हस्तांतरीत केलेले होते. महाराष्ट्र शासनाच्या पाटबंधारे विभागाने प्रकल्पाच्या मूलभूत स्थितीनुसार ३५० दशलक्ष लिटर पाण्याचा पुरवठा करण्यासाठी ऑक्टोबर, १९९० मध्ये बाळगंगा धरणावर प्रकल्प अहवाल तयार केला. या प्रकल्पाचा खर्च वर्ष १९९० मध्ये रु. ६७.६२ कोटी इतका होता आणि सिडको महामंडळाने ठराव क्र. ५८२७ दिनांक ११/१२/९२ द्वारे संभाव्य खर्चाशिवाय रु. ५१.५७ कोटी आणि संभाव्य खर्चासह रु. ६७.६२ कोटी इतक्या प्रकल्प खर्चास मान्यता दिली होती.

मध्यंतरी विशेष आर्थिक क्षेत्राची निर्मिती झाल्यामुळे राज्य शासनाकडुन बाळगंगा धरण प्रकल्प जानेवारी २००६ मध्ये नवी मुंबई सेझ या कंपनीकडे हस्तांतरीत करण्यात आला होता. तथापि विशेष आर्थिक क्षेत्राच्या भूसंपादनासाठी स्थानिक लोकांचा विरोध असल्यामुळे नवी मुंबई सेझ हा प्रकल्प घेण्यास तयार नव्हती आणि त्यानंतर शासनाने रायगड जिल्ह्यातील सेझ प्रकल्प वर्ष २००९ मध्ये रद्द केला होता. नवी मुंबई क्षेत्राच्या आगामी गरजांसाठी महाराष्ट्र शासनाने पुन्हा एकदा बाळगंगा धरण प्रकल्प सिडकोकडे हस्तांतरीत केलेला होता. मा. मंत्री जल संसाधन विभाग, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग (डब्ल्यु.आर.डी आणि डब्ल्यु.एस.) यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या जानेवारी, २००९ मधील बैठकीमध्ये असे ठरविण्यात आले की, केआयडीसी सिडकोसाठी बाळगंगा धरणाचे बांधकाम संपुर्ण अनामत तत्वावर करील. केआयडीसीच्या प्रस्तावानुसार, सिडकोच्या संचालक मंडळाने ठराव क्र. १००७० दिनांक २०/०२/२००९ अन्वये रु. ४८८.३४ कोटी इतक्या प्रकल्प खर्चाच्या धरणाच्या बांधकामास मंजुरी दिली होती. मा. मंत्री जल संसाधन विभाग, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये ठरविण्यात आल्याप्रमाणे, केआयडीसी बाळगंगा धरणाचे बांधकाम संपुर्ण अनामत तत्वावर करील आणि संपुर्ण पुनर्वसन व पुनर्स्थापना तसेच भूसंपादनासंबंधीची कामे देखील करील.

केआयडीसी कडुन कामाच्या निविदा देण्यात आल्या नंतर केआयडीसीने दिनांक १२/०५/२००९ रोजी रु. ४९५.४५ कोटीचे धरणाच्या बांधकामाचे कंत्राटी काम मेसर्स एफ.ए. एन्टरप्रायझेस या बांधकाम एजन्सीला प्रदान केले होते. त्यानुसार सिडकोने त्यास ठराव क्र. १०१९७ दिनांक २५/०८/२००९ अन्वये रु. ४९५.४५ कोटी इतक्या कंत्राटी खर्चास मान्यता दिली होती. सिडको आणि केआयडीसीमध्ये दिनांक २३/०९/२००९ रोजी धरणाचे बांधकाम करण्यासाठी करार झालेला होता आणि प्रत्यक्षात केआयडीसीने धरणाच्या बांधकामास दिनांक ०३/४/२०१० रोजी सुरूवात केली.

प्रत्यक्षात काम सुरु झाल्यानंतर एका वर्षाच्या अवधीमध्ये केआयडीसीकडून धरणाच्या खर्चामध्ये वेळोवेळी वाढ करण्यात आली. त्यामुळे फेब्रुवारी २०११ मध्ये या खर्चामध्ये रु.४९५.४५ कोटी पासून रु. ५९३.७३ कोटी पर्यंत आणि जुन २०११ मध्ये रु.१२२०.१९ कोटीपर्यंत वाढ झाली आणि एप्रिल २०१० मध्ये या प्रकल्पाच्या एकुण खर्चामध्ये रु. ९२४.०६ कोटी इतकी सुधारणा करण्यात आली आणि त्यानंतर फेब्रुवारी, २०११ मध्ये रु. ११८३.३५ कोटी व जुन, २०११ मध्ये १९७०.५६ कोटी इतकी सुधारणा करण्यात आली. या कामामध्ये कठीण दगड जास्त लागल्यामुळे आणि काँक्रीटमध्ये वाढ झाल्यामुळे मुख्यत: खर्चामध्ये वाढ झालेली आहे. या बाबी अतिरिक्त बाबी म्हणुन प्रस्तावित करण्यात आलेल्या आहेत. आणि हे काम सिडकोची मान्यता न घेता पार पाडलेले आहे. आणि सिडको व केआयडीसी यांच्यामध्ये झालेल्या करारानुसार सिडकोची मान्यता घेणे अनिवार्य होते.

भाव वाढ व खर्चातील वाढ निर्धारित करण्यासाठी आणि धरणाच्या बांधकामाचा संभाव्य पुर्णत्व खर्च निश्चित करण्यासाठी, सिडकोने यापुर्वी ३ समित्या नेमलेल्या आहेत. या तिन्ही समित्यांनी मे २०११ पासुन डिसेंबर, २०१३ पर्यंत या गोष्टींचा अभ्यास केला आणि या समित्यांनी दिलेल्या अहवालावर संचालक मंडळाच्या वेगवेगळ्या बैठकांमध्ये चर्चा करण्यात आली. या पुर्वीच्या तीन समित्यांनी काढलेल्या संभाव्य पुर्णत्व खर्चामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत दिसून आली. प्रकल्पाच्या संभाव्य बांधकाम खर्चाच्या आणि प्रदानाच्या शिफारशीनुसार यापैकी कोणताही अहवाल निर्णायक आढळून आला नाही. प्रस्थापित केलेल्या तीन सदस्यांनी दिलेल्या अहवालातुन निश्चित असे एकमत होऊ शकले नाही. त्यामुळे निश्चित असा निर्णय घेता आला नाही. म्हणुन संचालक मंडळाने डिसेंबर, २०१३ मध्ये डब्ल्यू आर.डी. विभागातील दोन तांत्रिक सदस्यांसह जस्टीस श्री. बी.जी. गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली चौथी समिती नेमली. या चौथ्या समितीला सिडको आणि केआयडीसी यांच्यामधील कराराचा भंग झाल्याचे आढळुन आले.

धरणाच्या बांधकामाचा वाढीव खर्च निश्चित न करता आल्यामुळे, सिडकोने केआयडीसीला मान्यतप्राप्त बांधकाम खर्चापेक्षा जास्त निधी दिला नाही. त्यामुळे हे काम मे २०१२ पर्यंत तसेच राहिले. ह्या दरम्यान बांधकाम एजन्सीने झालेल्या कामाचे पैसे न मिळाल्यामुळे डिसेंबर, २०१३ मध्ये नामदार उच्च न्यायालयामध्ये रिट याचिका दाखल केली.

त्यानंतर डिसेंबर, २०१३ ते जुलै, २०१५ च्या दरम्यान या प्रकरणी उच्च न्यायालयामध्ये सुनावणी झाली. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांनी दिलेल्या संमतीच्या आधारे आणि सर्व पक्षकारांनी दिलेल्या मान्यतेनुसार नामदार उच्च न्यायालयाने पिठासीन लवादाच्या जागी सेवानिवृत्त जस्टीस, उच्च न्यायालय आणि अनुक्रमे राज्य शासन, विनंती अर्जदार - बांधकाम एजन्सी, सिडको आणि केआयडीसी यांच्याकडील अन्य चार लवाद सदस्य यांची नेमणुक करुन दिनांक १७/०७/२०१५ रोजी केआयडीसीच्या प्रस्थापित एजन्सीची रिट याचिका निकाली काढली. त्यानुसार लवाद न्यायाधिकरणाची प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे.

प्रकल्पासाठी रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील १५७९.७८ हेक्टर जमिन पाहीजे. त्यापैकी सुमारे १०५८.७९ हेक्टर (निमज्जन) जागेसाठी तोडगा काढण्यात येत असुन १५९.७८ हेक्टर जागा २९७७ कुटुंब (अंदाजे ७७०० माणस) कुटुंबांच्या पुनर्वसनासाठी (पुनर्वसन व पुन: स्थापना) आवश्यक आहे आणि ३६१ हेक्टर जागा वन विभागाची आहे. रायगड जिल्हाधिकाऱ्याने ऑक्टोबर २०१५ मध्ये सर्व खाजगी जागा संपादन केलेल्या आहेत आणि केआयडीसी मार्फत वनभूमिच्या संपादनाची प्रक्रिया सुरु आहे.

सिडकोने केआयडीसीला विविध शिर्षकाखाली आजमितीपर्यंत केलेली एकुण प्रदाने खालील प्रमाणे नमुद करण्यात आलेली आहेत.

अनु.क्र.	वर्णन	सिडकोने केआयडीसीला प्रदान केलेली रक्कम (रु. कोटीमध्ये)
१.	धरणाचे बांधकाम	४९४.१५
२.	भू संपादन (धरणासाठी व पुनर्वसनासाठी) + भाडे भरपायी	६००.५७
३.	मोबिलायझेशन अग्रिम, मातीची तपासणी, सीडीओ, नाशिकचे शुल्क इ.	२६.४७
४.	मोबिलायझेशन अग्रीम वसुली	-१४.६१
	एकूण	**११०६.५८**

प्रभागीय विकास कामे :-

सिडकोने कळंबोली गोदाम संकुलाजवळ उड्डाणपुलाचे बांधकाम हाती घेतलेले आहे. या पुलामुळे प्रस्तावित विशेष आर्थिक क्षेत्र (CRZ) जोडले जाईल तसेच तळोजा औद्योगिक क्षेत्राकडे जाण्यासाठी हा दुसरा मार्ग उपलब्ध होईल. या उड्डाण पुलाचा अंदाजित खर्च रु. ५९.१० कोटी इतका आहे. या पुलाच्या बांधकामानंतर केएम ६१/१०-११ येथील विद्यमान रेल्वे ओलांडणी गेट क्र. १४ बंद करण्यात येईल.

रेल्वे प्रकल्प :-

उपनगरी सामुहीक प्रवासी रेल्वे वाहतुक यंत्रणेचे संकल्पन एकत्रित रेल्वे स्थानक व व्यापारी संकुल या स्वरुपात करण्यात आलेले आहे. सिडकोने नवी मुंबईसाठी आखणी केलेल्या व्यापक जाळ्यात सहा रेल्वे क्षेत्राचा समावेश आहे. हे भारतातील असाधारण स्वरुपाचे रेल्वे प्रकल्प असुन त्यासाठी येणाऱ्या ६७ टक्के खर्चाचा भाग सिडको सोसणार आहे. तर ३३ टक्के रेल्वे करणार आहे.

(अ) ठाणे-तुर्भे-वाशी-नेरूळ रेल्वे मार्ग प्रकल्प:-

ऐरोली, घणसोली, कोपरखैरणे आणि तुर्भे या चार स्थानकांचा समावेश असणाऱ्या ठाणे ते वाशी रेल्वेमार्गाचा पहीला टप्पा दिनांक ९/११/२००४ रोजी कार्यान्वित करण्यात आला. तुर्भे ते नेरुळ रेल्वे मार्गाच्या दुसऱ्या टप्प्याचे काम दिनांक ०९/०१/२००९ रोजी पुर्ण करण्यात आले. रबाळे स्थानक सन २००९ मध्ये कार्यान्वित करण्यात आले. ठाणे-तुर्भे-नेरूळ-वाशी (TTNV) रेल्वे मार्ग प्रकल्पासाठी अनुक्रमे सिडको आणि मध्य रेल्वे यांच्यामध्ये ६७:३३ अशा प्रमाणात प्रारंभी मंजुर करण्यात आलेला प्रकल्प खर्च रु. ४०३.३९ कोटी इतका होता. तसेच या प्रकल्प खर्चामध्ये दिनांक २८/११/२०१३ रोजीच्या ठराव क्र. १०९३३ अन्वये संचालक मंडळाने दिलेल्या मंजुरीनुसार रु. ५७४.३६ कोटी इतकी वाढ करण्यात आली. (त्यातील सिडकोचा भाग-रु. ३८४.८२ कोटी. आणि मध्ये रेल्वेचा भाग रु. १८९.५० कोटी) मार्च, २०१५ पर्यंत सिडकोने या प्रकल्पासाठी रु. ३०१.३९ कोटी इतका खर्च केलेला आहे.

(ब) बेलापूर-पनवेल दुपदरी रेल्वे मार्ग प्रकल्प:-

बेलापुर-पनवेल दुपदरी रेल्वेमार्ग किमान प्राथमिक सोयींसह दिनांक १४/०४/२००० रोजी कार्यान्वित करण्यात आला. त्यानंतर खारघर, पनवेल आणि खांदेश्वरच्या विकासाचे काम हाती घेण्यात आले. खारघर रेल्वे स्थानकाच्या विकासाचे काम दिनांक १२/०६/२००४ रोजी, खांदेश्वर रेल्वे स्थानकाच्या विकासाचे काम डिसेंबर, २००६ मध्ये आणि पनवेल रेल्वे स्थानकाचे विकास विषयक काम ३०/०९/२००७ मध्ये पुर्ण करण्यात आले. मानसरोवर रेल्वे स्थानक दिनांक २८/०२/२००८ रोजी किमान प्राथमिक सोयींसह कार्यान्वित करण्यात आले. पनवेल, खांदेश्वर, आणि मानसरोवर रेल्वे स्थानकाचे प्रांगण क्षेत्र अंशत: विकसित करण्यात आलेले आहे. सिडको आणि रेल्वे यांच्यामध्ये अनुक्रमे ६७:३३ या प्रमाणातील भागिदारीमध्ये करावयाच्या बेलापुर-पनवेल दुहेरी रेल्वे मार्गाच्या प्रकल्पासाठी २७९.५३ कोटी रुपयांची तरतुद करण्यात आलेली आहे. या प्रकल्पावर २०१४-१५ या आर्थिक वर्षामध्ये १९६.९५ कोटी रुपये खर्च झालेले आहेत. तर मार्च, २०१५ पर्यंत एकूण २९३.९५ कोटी रुपये खर्च झालेले आहेत.

(क) नेरूळ-बेलापूर-उरण प्रवासी रेल्वे मार्ग:-

नवी मुंबईतील नेरुळ आणि उरण यांना जोडणाऱ्या या रेल्वे मार्गाचे काम यापुर्वीच हाती घेण्यात आले आहे. एकूण सुधारित प्रकल्प खर्च रु. १८१४.४८ कोटी इतका असुन सिडको आणि एमटीपी (रेल्वे) यांनी हा खर्च अनुक्रमे ६७.३३ या प्रमाणात उचलण्यास मान्यता दिलेली आहे, जो अनुक्रमे रु.१२१५.७० कोटी आणि रु. ५९८.७८ कोटी इतका येतो. सिडको आणि एमटीपी (रेल्वे) यांना एकत्रितपणे दिनांक ३१/३/२०१५ पर्यंत २३०.६९ कोटी खर्च झालेला आहे. सिडको आणि एमटीपी रेल्वे यांनी वर्ष २०१४-१५ मध्ये अनुक्रमे २९३.८४ कोटी रुपये आणि १४४.७२ कोटी रुपये खर्च केलेला आहे. मान्यता दिलेल्या प्रमाणानुसार मार्च, २०१५ पर्यंत सिडकोने एकूण ५८.२० कोटी रुपये रोख जमा केलेले आहेत.

भू-संपादन न झाल्यामुळे आणि इतर अडचणींमुळे या रेल्वे मार्गाचे काम अडून राहिलेले आहे. सिडकोने द्रोणागिरी आणि सीवुड्स येथे दोन उड्डाण पुलांचे बांधकाम पुर्ण केलेले आहे. आणि एमएसईबी (जीटीपीएस) द्रोणागिरी जवळच्या आणि उरण रेल्वे स्थानकाजवळच्या उर्वरित दोन उड्डाण पुलांची कामे प्रगतीपथावर आहेत. या दोन उड्डाण पुलांसाठी आर्थिक वर्ष २०१५-१६ मध्ये २८०० लाख रुपयांची अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आलेली आहे. सिडकोने एल अँड टी लिमिटेड यांना मेगासिटी प्रकल्पाअंतर्गत सीवूड स्थानक बांधण्याचे काम प्रदान केलेले असुन त्यातील टप्पा एकचे काम मार्च २०१६ पर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. सीवुड्स रेल्वे स्थानकाच्या बांधकामासाठी २०१४-१५ या आर्थिक वर्षामध्ये १५०० लाख रुपयांची अर्थसंकल्पीय तरतुद केलेली आहे, तसेच पहिल्या टप्प्यामध्ये सागरसंगम, तरघर, बामनडोंगरी आणि खारकोपर अशी चार रेल्वे स्थानके बांधण्याचे प्रस्तावित आहे. कामाचे प्रदान पुर्ण करण्यात आलेले आहे. या स्थानकांच्या कन्सल्टन्सी कामाकरीता २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी ५.०० लाख रुपयांची अर्थसंकल्पिय तरतुद करण्यात आलेली आहे.

(ड) सीवुडस् रेल्वे स्थानक:-

सीवुड्स रेल्वे स्थानक हा नेरुळ - उरण रेल्वे मार्गाचा एक भाग असुनही करावे गावचे स्थानिक लोक, दारावे गावचे स्थानिक लोक आणि सेक्टर-४०, ४२ व ४६ इत्यादी विकसित सेक्टर मधील रहीवाशी यांच्याकडून सातत्याने होत असलेली मागणी विचारात घेऊन सिडकोने स्टॉप गॅप व्यवस्था म्हणून पर्यायी मार्गाची तरतुद करुन मानखुर्द-बेलापुर रेल्वे मार्गावर स्थानक विकसित केले आहे. या स्थानकाचे काम यशस्वीरित्या पूर्ण होऊन दिनांक १२/०६/२००४ रोजी केवळ बेलापुर लोकलसाठी थांबा स्थानक म्हणून कार्यान्वित केलेले आहे.सिडकोने तात्पुरते छप्पर, प्लॅटफॉर्म आणि तिकिट खिडक्या, किमान प्रांगण क्षेत्र इत्यादीसारखी सहाय्यभूत बांधकामे पुर्ण केलेली आहेत. हे स्थानक पामबीच मार्गावरील प्रतिष्ठेच्या सीवुड इस्टेट्स मधील सर्वांच्या नजरा आकर्षित करणारे एक केन्द्र ठरेल. एकुण मंजुर प्रकल्प खर्च ४९५.४४ कोटी रुपये असुन करारानुसार सिडको आणि एमटीपी (रेल्वे) यांनी अनुक्रमे ३३१.९५ कोटी रु. आणि १६३.४९ कोटी रुपये खर्च करावयाचा आहे. सिडको आणि एमटीपी रेल्वे यांनी एकत्रितपणे दिनांक ३१-०३-२०१५ पर्यंत १८३.७४ कोटी रुपये खर्च केलेला आहे. सिडको आणि एमटीपी (रेल्वे) यांना २०१४-१५ च्या दरम्यान अनुक्रमे २१.२७ कोटी रुपये आणि ९.०८ कोटी रुपये इतका अर्थसंकल्पीय खर्च झालेला आहे. मान्य केलेल्या प्रमाणानुसार मार्च, २०१५ पर्यंत सिडकोने एकुण १०१.६८ कोटी रुपये खर्च केलेला आहे.

सिडकोने १८०९ कोटी रुपये रकमेचे सीवूड्स रेल्वे स्थानकाचे बांधकाम आणि विकास करण्याच्या उद्देश्याकरिता मेसर्स एल अँड टी लि.यांना भाडेपट्टा तत्त्वावर विकास अधिकार दिलेले आहेत. विकास करारावर दिनांक २१ एप्रिल, २००८ रोजी स्वाक्षरी करण्यात आली. मेसर्स एल अँड डी लिमिटेड सीवूड्स रेल्वे स्थानकामध्ये वाणिज्यिक सुविधा आणि रेल्वे सुविधा विकसित करील. रेल्वे सुविधा कामाची अनामत म्हणून ३५ कोटी रुपयांसह (रेल्वे सुविधा यशस्वीरित्या पुर्ण झाल्यावर विकासकास परत करण्यायोग्य रक्कम) भाडेपट्टा अधिमूल्याचे पुढील प्रदान म्हणुन ७२४ कोटी रुपये दिनांक १६-०४-२००८ रोजी भरण्यात आले होते. उर्वरित रकमेचा मेसर्स एल अॅन्ड टी. लिमिटेडकडून तीन (३) हप्त्यांमध्ये भरणा करण्यात येईल. सिडको रेल्वे सुविधा कामासाठी पी.एम.सी. म्हणून कार्यवाही करील. हे काम पुर्ण झाल्यानंतर रेल्वे सुविधा रेल्वे प्राधिकारणाकडे स्वाधीन करण्यात येतील. दिनांक १५ मे, २०१२ रोजी रेल्वेच्या (रेल्वे सुरक्षा आयुक्त) सीआरएसची मंजुरी मिळाल्यानंतर सीवुड्स रेल्वे स्थानकातील रेल्वे सुविधांचे काम मे, २०१२ मध्ये सुरु करण्यात आले. रेल्वे मार्गातील सबवे आणि फलाटांचे काम प्रगतीपथावर आहे.

मेट्रो प्रकल्प :-

नवी मुंबई मेट्रो रेल प्रकल्प :-

महाराष्ट्र शासन सिडको लिमिटेडच्या माध्यमातून नवी मुंबईमध्ये नवी मुंबई मेट्रो रेल्वे मार्ग कार्यान्वित करीत आहे. मेसर्स दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन (डीएमआरसी) आणि, मेसर्स लि. असोशिएट्स साऊथ एशिया प्रा. लि. यांनी केलेल्या व्यापक परिवहन विषयक अभ्यासातून बेलापूर-खांदेश्वर-नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ मेट्रो रेल्वे मार्गाची एक संभाव्य विकासयोग्य रेल्वे मार्ग म्हणून शिफारस करण्यात आलेली आहे. या मेट्रो रेल्वे मार्गाचा तीन टप्प्यांमध्ये विकास करण्याची शिफारस करण्यात आली होती. हे तीन टप्पे खालीलप्रमाणे :-

१) मेट्रो रेल्वे मार्ग-१ : बेलापूर ते पेंधर - ११.१० कि.मी.
२) मेट्रो रेल्वे मार्ग-२ : खांदेश्वर ते तळोजा एमआयडीसी -८.३५ कि.मी.
३) मेट्रो रेल्वे मार्ग-३ : तळोजा येथील मेट्रो रेल्वे मार्ग-१ आणि मेट्रो रेल्वे मार्ग २चा जोडमार्ग - २.०० कि.मी.

तांत्रिक प्रस्ताव :-

सध्या सिडकोने बेलापूर पासून पेंधर पर्यंत कॉरिडॉर-एक, मार्ग क्र. १ चे विकासकार्य हाती घेतलेले आहे.

संक्षिप्त तांत्रिक घटक

तपशिल		प्रस्तावित घटक
गेज	-	स्टँडर्ड गेज रूंदी (१४३५ मीमी)
कर्षण यंत्रणा	-	ओव्हरहेड सामग्री २५ केव्ही एसी
संकेत यंत्रणा	-	दळणवळण आधारित ट्रेन नियंत्रण (सी बी टी सी)
गाडीची लांबी ३/६ कार ट्रेन सेट	-	६८.२/१३५.४ मी.
गाडीचे डब्बे	-	स्टेनलेस स्टील
डब्याचे मोजमाप	-	उंची ४.०५ मी आणि रुंदी ३.२० मी.
कमाल प्रवर्तनिय वेग	-	८५ केएमपीएच
वाणिज्यिक वेग	-	३२ केएमपीएच
३ डब्यांची प्रवासी क्षमता	-	११२५ (आसन - १५०, उभे प्रवासी - ९७५)

या मेट्रो रेल्वे मार्गाला बेलापूर आणि खांदेश्वर रेल्वे स्थानकामध्ये विद्यमान उपनगरीय यंत्रणेच्या जोडमार्गाची सोय असेल तसेच हा मार्ग पुढे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळापर्यंत वाढविण्यात येईल.

वर्ष २०१६ पर्यंत पीएचपीडीटी (पिक अवर पिक डिरेक्शनल ट्रॅफिक) ६०००-७००० इतकी असेल म्हणून ८ मिनिटांच्या अंतराने तीन डब्यांची मेट्रो गाडी या मार्गावर सुरु करण्याचे प्रस्तावित करण्यात आलेले आहे. संकेत यंत्रणा ही दळणवळण आधारित ट्रेन नियंत्रण (सीबीटीसी) स्वरूपाची असेल. मेट्रो मार्ग निरीय विरहीत असतील. मेट्रोचे आगार तळोजा येथे २० हेक्टर जागेवर नियोजित आहे.

नगर विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी केंद्रीय मेट्रो अधिनियमांन्वये बेलापूरपासून पेंधर पर्यंत कार्यान्वित करावयाच्या नवी मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प, कॉरिडॉर-१, मार्ग क्र. १ साठी पत्र क्र. के-१४०११/२१/२०१२ मेट्रो/एमआरटीएस-दोन दि.३०/०४/२०१३ या पत्रान्वये तत्वत: मंजुरी दिली तसेच एमओयुडी, भारत सरकार यांच्याकडुन मेट्रो रेल्वे(बांधकामे) अधिनियम, १९७८ चे कलम-३२ अन्वये संरेखनाची अधिसूचना दिनांक ९ जानेवारी, २०१५ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

प्रकल्पाची सद्यस्थिती :-

१) **तपशिलवार प्रकल्प अहवाल (डी.पी.आर.) :-** दिल्ली मेट्रो रेल (डी.एम.आर.सी.) कॉर्पोरेशनने तपशिलवार प्रकल्प अहवाल तयार केलेला आहे.

२) **सर्वसामान्य सल्लागारी (जी.सी.) :-** नवी मुंबई मेट्रो रेल्वे मार्ग-१चे बेलापुर पासुन पेधर पर्यंतचे कार्यान्वयन करण्यासाठी दि. लुईस बर्गर ग्रुप इन्क यांची नेमणुक करण्यात आलेली आहे.

३) **मेट्रो पुलाचे काम :-** हे काम दोन भागांमध्ये प्रदान करण्यात आले असून कंत्राटाचा एकूण खर्च रू. ३०५ कोटी इतका आहे.

एजन्सी :- मे. एनसीसी लि. आणि मे. जे. कुमार इन्फ्रा प्रोजेक्ट लि.

सद्यस्थिती :- काम सुरू आहे.

४) **स्थानक कामे :-** हे काम दोन भागांमध्ये प्रदान करण्यात आले असून कंत्राटाचा एकूण खर्च रू. ३२१ कोटी इतका आहे.

एजन्सी :- दि कन्सोर्शिअम ऑफ संजोस - महावीर - सुप्रिम

सद्यस्थिती :- काम सुरू आहे.

५) **तळोजा येथील आगार विषयक स्थापत्य कामे :-** कामाचे मुल्य रू. १३२ कोटी इतके आहे.

एजन्सी :- दि. कन्सोर्शिअम ऑफ मेसर्स जे. कुमार - सीआरटीजी (जेव्ही)

सद्यस्थिती :- काम सुरू आहे.

६) **यंत्रणेविषयक कामे :-** रेल्वे विषयक यंत्रणेची टर्न की कामे जसे संकल्पचित्र, उत्पादन, पुरवठा, संचमांडणी, चाचणी, रोलिंगस्टॉक, संकेत आणि ट्रेन नियंत्रण, वीज पुरवठा, कर्षण, स्काडा, मेट्रो रूळाची कामे, स्वयंचलित शुल्क संकलन(ए. एफ.सी.), आगार साहीत्य, विविध रेल्वे यंत्रणे विषयक घटकांचे एकत्रिकरण यांच्या समावेशासह टर्न की तत्वावर संपुर्ण रेल्वे यंत्रणेचे कार्यान्वयन आणि तीन वर्षांसाठी देखभाल इत्यादी कामे अन्साल्डो एसटीएस एसपीए प्रमुख असलेल्या मेसर्स ॲन्टॅक्स कन्सोर्शिअम (अन्साल्डो एसटीएस एसपीए, टाटा प्रोजेक्ट्स लि. आणि सीएसआर झुझाव इलेक्ट्रीक लोकोमोटीव्हज लि. यांचा व्यापारी संघ) यांना देण्यात आलेली आहेत.

कंत्राटी मूल्य :- रु.१३२७.७५ कोटी इतके
सद्यास्थिती :- काम सुरु आहे.

७) **प्रवर्तन आणि देखभाल :-** नवी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन या स्वतंत्र उपकंपनीची स्थापना करण्याचे नियोजन आहे. मेट्रो रेल्वे मार्गाचे कार्यान्वयन आणि देखभाल करण्यासाठी खाजगी प्रचालकाला कार्यान्वयन आणि देखभाल कामे देण्याचे प्रस्तावित आहे.

प्रकल्पाच्या खर्चाचे तपशिल:-

बेलापुर-पेंधर-तळोजा एमआयडीसी-कळंबोली-खांदेश्वर- एनएमआयए रेल्वे मार्गाची कामे खाली दिल्याप्रमाणे टप्प्याटप्प्याने करावयाची आहेत.

- **मेट्रो मार्ग क्र-१ :-** बेलापूर ते पेंधर (११.१०किमी)
(कार्यान्वयनाखाली)
अपेक्षित भांडवली खर्च (अंदाजे) रु. ३,०४३ कोटी
- **मेट्रो मार्ग क्र. २ :-** खांदेश्वर ते तळोजा एमआयडीसी (८.३५ किमी)
प्रकल्प खर्च (अंदाजे) रू. ४,०४३ कोटी
- **मेट्रो मार्ग क्र. ३ :-** मेट्रो मार्ग क्र. १ आणि मेट्रो मार्ग क्र. २ ची आंतरजोडणी (२.०० किमी)
प्रकल्प खर्च (अंदाजे) रू. ८६१ कोटी
- **मेट्रो मार्ग क्र. ४ :-** खांदेश्वर पासुन नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळापर्यंत (३.०० किमी)
प्रकल्प खर्च (अंदाजे) रू. ७६५ कोटी

मानवी संसाधन विकासाशी संबंधित योजना

अ) आयएसओ कार्यान्वयन:-

महामंडळाच्या सामुहिक गृहनिर्माण योजना जून २००२ पासून आयएसओ प्रमाणपत्राच्या कक्षेत आहेत. मेसर्स डेट नॉर्स्के व्हेरिटास (डीएनव्ही) यांनी जून, २००२ मध्ये सिडकोला जून, २००५ पर्यंतच्या विधिग्राह्यतेसह आयएसओ ९००१-२००० प्रमाणिकरण दिलेले आहे. या प्रमाणिकरणाच्या विधिग्राह्यतेची मुदत पुढील ३ वर्षांपर्यंत म्हणजे जून २००८ पर्यंत वाढविण्यात आलेली आहे.

तसेच पुढे देखिल आयएसओ ९००१ : २००८ चे नुतनीकरण करण्यात आले होते आणि सिडकोला जून २०११ पर्यंत आयएसओ ९००१ : २००८ च्या विधिग्राह्यतेची मान्यता दिलेली होती.

प्रमाणिकरणाचे सातत्य राखण्यासाठी अभियांत्रिकी विभागाने हाती घेतलेल्या सामुहिक गृह निर्माण प्रकल्पासाठी जून २०१४ पर्यंत आयएसओ ९००१ : २००८ चे प्रमाणिकरण विधिग्राह्य केलेले आहे.

ब) अभियंते व सर्वसामान्य कर्मचारी वर्ग यांचे प्रशिक्षण:-

अभियांत्रिकी कर्मचाऱ्यांच्या सक्षमतेमध्ये सातत्याने सुधारणा करण्याचा एक भाग म्हणून आपण आपल्या अभियंत्यांना सीआयडीसी, आयआयटी बॉम्बे, अभियंता कर्मचारी महाविद्यालय, हैद्राबाद, यशदा, एमसीजीएम यासारख्या वेगवेगळ्या व्यावसायिक संघटनांनी/संस्थांनी आयोजित केलेल्या वेगवेगळ्या कार्यशाळा/चर्चासत्रे /प्रशिक्षण कार्यक्रम यांचा लाभ घेण्यास पाठवित असतो.

तंत्रशास्त्रीय नवोपक्रम:-

महामंडळ आपल्या कार्ययंत्रणेत सुधारणा करण्यासाठी नवोपक्रम आणि प्रगत तंत्रज्ञान कार्यान्वित करण्याचा, अभियांत्रिकी यंत्रणेचे ज्ञान व कौशल्य याच्या दर्जात सुधारणा करण्याचा आणि संकल्पचित्र व अंमलबजावणी या दोन्ही टप्प्यांवर खर्चात काटकसर साध्य करण्याचा सातत्याने प्रयत्न करीत असते. चालू वित्तिय वर्षात प्रस्तावित करण्यात आलेल्या उपाययोजना पुढीलप्रमाणे आहेत:-

अ) संरचना संकल्पचित्र:-

आपण स्टॅड प्रो अँड स्टॅड फाउन्डेशन सॉफ्टवेअरसह स्टॅड आरसीडीसी आणि स्टॅड प्लेविन या दोन सॉफ्टवेअर्सची खरेदी केलेली आहे. या सॉफ्टवेअरचा वापर आपण संरचनात्मक विश्लेषणासाठी आणि विविध प्रकारच्या संरचनांसाठी करीत आहोत.

डिझाईन सर्कलने प्रो. व्ही. एल. शाह यांच्या माध्यमातून बेसिक ॲनालिसिस अँड डिझाईन स्ट्रक्चर मधील ५ दिवसांच्या प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केलेले आहे. आपण रचना अभियंत्यांसाठी स्टॅड प्रो. सॉफ्टवेअरमध्ये चार दिवसांच्या प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केलेले आहे.

ब) पायाभूत सोयींचे संकल्पचित्र :-

पावसाळी पाण्याचा निचरा करण्याच्या द्रवचलित संकल्पचित्रासाठी आपण बेन्टले सॉफ्टवेअरचा वापर करीत आहोत. जरी पावसाळी पाण्याच्या निचरा यंत्रणेसाठी सुधारित रचना प्रमाणपद्धत तयार करण्यात आलेली होती आणि आयआयटीकडून या प्रमाण पद्धतीची तपासणी करण्यात आली होती, तरी आपण यापुर्वीच्या प्रमाण पद्धतीचा (नाटू समिती अहवाल) अवलंब करण्याचे ठरविले आहे, जी अधिक सुरक्षित आहे.

क) पर्यावरणीय संकल्पचित्र :-

प्रमाणके आणि सीपीएचईईओ नियमपुस्तिकेनुसार आपण आपल्या गरजा भागविण्यासाठी बेन्टले सॉफ्टवेअरचा वापर करीत आहोत.

आयएसओ - ९००२ प्रमाणपत्र:-

सिडकोच्या रेल्वे प्रकल्प विभागास आयएसओ-९००२ प्रमाणपत्र मिळवणे शक्य झाले आहे. आपणास सामुहीक गृहनिर्माण प्रकल्पांसाठी आयएसओ - ९००१-२००० प्रमाणपत्र मिळविणे शक्य झाले आहे. कंत्राटदारांना देखिल आयएसओ प्रमाणपत्र मिळविण्यास प्रोत्साहन दिले जात आहे आणि आमच्या दोन कंत्राटदारांनी आयएसओ प्रमाणपत्र मिळविलेले आहे.

सांस्कृतिक कार्यक्रम:-

महामंडळ नवी मुंबई शहराची सांस्कृतिक प्रतिमा उंचावण्याकरिता आणि सांस्कृतिक संरक्षक म्हणून सिडकोच्या नावास प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी गेल्या चार वर्षापासून सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करीत आहे.

वार्षिक सामाजिक सम्मेलन:-

महामंडळाचे कर्मचारी, अधिकारी व त्यांचे कुटुंबिय यांच्या विविध प्रकारच्या क्रिडा व सांस्कृतिक क्षेत्रातील कलागुणांना वाव मिळावा यासाठी त्यांना एक व्यासपिठ उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने या वर्षी सामाजिक संमेलन आयोजित करण्यात आले. यामुळे कर्मचारी आणि अधिकारी यांना एकत्र येऊन परस्परांमध्ये आपआपल्या कल्पनांची व विचारांची देवाणघेवाण करण्याची संधी प्राप्त झाली.

सिडको नवी मुंबई उत्सवाची ठळक वैशिट्ये:-

सिडकोने वर्ष २००८-०९ आणि वर्ष २००९-१० अशा सलग दोन वर्षी नवी मुंबई महोत्सवाचे यशस्वीरित्या आयोजन केले, ज्याला लोकांचा प्रचंड प्रतिसाद लाभला. नवी मुंबईकरांनी या महोत्सवामध्ये सक्रीय सहभाग घेतला आणि हे दोन्ही महोत्सव संस्मरणीय ठरले. या महोत्सवाचा नवी मुंबईकरांनीच नव्हे तर मुंबईकरांनी देखिल आनंद लुटला. मुंबईतील आणि नवी मुंबईतील बहुसंख्या शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी या महोत्सवामध्ये भाग घेतला.

या महोत्सवाला बहुसंख्य नामवंत आणि प्रतिष्ठित आसामींनी हजेरी लावली. एनजीओ आणि सामाजिक संघटनांना देखिल या महोत्सवाने आकर्षून घेतले. बहुसंख्य सामाजिक संघटना यामध्ये सहभागी झाल्या आणि या महोत्सवाला भरभरून स्तुतिसुमने वाहीली. या महोत्सवादरम्यान बहुसंख्य सामाजिक मोहीमा राबविल्या गेल्या. त्यांनी बहुसंख्य लोकांना आकर्षुन घेतले. आपली बुद्धिमता आणि कला कौशल्य दर्शविण्यास आसुसलेल्या युवा पिढीसाठी सिडको नवी मुंबई महोत्सव हे फार मोठे व्यासपीठ आहे. या महोत्सवामध्ये फक्त सांस्कृतिक किंवा संगितविषयक कार्यक्रम होतात असे नाही तर वेगवेगळ्या स्पर्धा, खेळ, नृत्य, शैक्षणिक कार्यशाळा आणि विद्यार्थ्यांसाठी चर्चा सत्रे इत्यादी कार्यक्रम देखिल आयोजित केले जातात.

याच धर्तीवर सांस्कृतिक कला गुणांना वाव देण्यासाठी व संपुर्ण नवी मुंबईकरांना एकत्र आणण्यासाठी तसेच आपली एकी दर्शविण्यासाठी नवी मुंबई महानगर पालिका (एनएमएमसी) देखिल विविध प्रकारच्या उत्सवांचे आयोजन करते आणि या शहराची समृद्ध परंपरा आणि संस्कृतीचा लोकांच्या मनात ठसा उमटविण्यासाठी विविध प्रकारचे शो देखिल आयोजित करते. या महोत्सवांचे आयोजन करून आपण आपल्या समृद्ध परंपरेचा आणि संस्कृतिचा ठेवा जतन करून ठेवीत असतो. सिडकोने नेहमीच आपल्या संस्कृतीची आणि परंपरेची काळजी घेतलेली आहे. सिडकोने आपली परंपरा जपण्यासाठी बहुसंख्य केंद्र विकसित केलेले आहेत.

सिडकोने नवी मुंबईच्या विविध प्रभागांमध्ये सामाजिक सम्मेलने घेण्यासाठी विशेष जागांचे बांधकाम केलेले आहे. बेलापूर येथील सिडकोचे अर्बन हाट हे त्यापैकी एक आहे. या अर्बन हाटमध्ये वर्षभर सांस्कृतीक कार्यक्रमांचे आणि प्रदर्शनांचे आयोजन केले जाते. या अर्बन हाटमध्ये प्रशस्त प्रेक्षागार आहे. या ठिकाणी एखादी व्यक्ती नियमितपणे शो आणि कार्यक्रम सहज आयोजित करू शकते. कमीत कमी दराने कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी सामाजिक संघटना, शाळा, महाविद्यालये आणि इतर इच्छुक लोकांना देखिल प्रेक्षागार भाड्याने दिले जाते. सिडकोने खारघर येथे बांधलेले सेंट्रल पार्क हे देखिल अतिशय लोकप्रिय असे एक ठिकाण आहे. जल क्रीडा, क्रिकेट आणि फुटबॉलसाठी मैदाने, क्रीडा क्लब, ॲम्फीथिएटर इत्यादींनी सुसज्ज असे हे ठिकाण आहे. बहुसंख्य सामाजिक संघटना, शाळा, महाविद्यालये आणि इतर इच्छुक व्यक्ती या ठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करीत असतात. हे ठिकाण म्हणजे आशिया खंडातील सर्वात मोठे करमणुकप्रधान उपवन आहे.

हा प्रवास इथेच संपत नाही; नवी मुंबईचा अभिमान बाळगण्यासाठी सिडको नियमितपणे कार्यक्रमांचे आयोजन करीत असते आणि त्यामध्ये सहभागी होत असते. नवी मुंबई महोत्सवाचा लक्षणीय प्रवास पाहता बहुसंख्य एनजीओ, सामाजिक संघटना, शाळा, महाविद्यालये आणि इतर संस्था यांना एक प्रकारे प्रेरणा मिळून ते नियमितपणे नवी मुंबई महोत्सवाच्या धर्तीवर सांस्कृतिक कार्यक्रम आणि इव्हेन्टस् आयोजित करतात.

ऐरणीवरील नवीन प्रतिभा प्रकल्प

गृहनिर्माण क्षेत्र

आपल्या गृहनिर्माण प्रकल्पामध्ये अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करून सिडको समाजाच्या प्रत्येक स्तरासाठी परवडण्यायोग्य दर्जेदार घरांचा पुरवठा करणारा एकमेव विकासक बनला आहे.

नेरूळ येथील सीवुडस् इस्टेट, फेज-दोन, भाग-दोन:-

लोकांना आपल्या स्वप्नातील प्रशस्त आणि ऐषारामी घरं मिळावी म्हणून सीवुडस् इस्टेट योजना हाती घेण्यात आली. सागरी किनारा लाभलेल्या आणि निसर्गरम्य अशा परिसरातील सीवुडस् इस्टेट योजनेमध्ये नवी मुंबईच्या आधुनिक शहरांमध्ये पर्यावरण आणि आरामदायी जीवन यांची सुंदर व आश्चर्यकारक गुंफण दिसून येते.

सन २००७ मध्ये सिडकोने १२७५चौ.फूट ते २७०० चौ.फुट क्षेत्रफळाच्या २ बीएचके/ ३ बीएचके/दुमजली सदनिका/पेन्ट हाऊस अपार्टमेंटस् (एकूण २५२) असलेल्या ४ (स्टिल्ट+१८ मजली) इमारतींचा समावेश असणाऱ्या फेज-दोन, भाग-दोन बांधण्याचे काम हाती घेतले.

फेज-दोन, भाग-एक अंतर्गत कामाचा एकूण खर्च रू. ९१.०० कोटी रुपये असून फेज-दोन, भाग-दोन अंतर्गत कामाचा खर्च रू. ८५.०० कोटी रुपये झालेला आहे.

खारघर येथील सेक्टर-१६ आणि १७ मधील नवीन सामुहीक गृहनिर्माण योजना, 'वास्तुविहार' आणि 'सेलिब्रेशन'.

महामंडळाने सेक्टर-१६ आणि १७ मध्ये नवीन सामुहीक गृहनिर्माण योजनेचे बांधकाम हाती घेतलेले आहे, ज्यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अनु. क्र.	प्रकार	इमारतींची संख्या	सदनिकांची संख्या	बांधकामाखालील क्षेत्र/सदनिका (चौ.मी.)	एकुण बांधकामाखालील क्षेत्रफळ (चौ. मी.)
१.	केएच-१ (एस + ४)	३९	६२४	२८.०५	१७,५०२.८१
२.	केएच-२ (एस + ४)	३२	५१२	४०.९२	२०,९५०.०८
३.	केएच-३ (एस + ७)	१७	४७६	५६.६२	२६,९५१.१२
४.	केएच-४ (एस + ७)	१९	५३२	९५.७९	५०,९६०.२८
	एकूण	**१०७**	**२१४४**		**१,१६,३६४.२९**

मेसर्स बी. जी. शिर्के सीटीपीएल यांना केएच-१, केएच-२, केएच-३ आणि केएच-४ प्रकारच्या सदनिकांचे कंत्राट प्रदान करण्यात आले होते. या योजनेमध्ये चार प्रकारच्या सदनिकांचे म्हणजेच केएच-१ (२५ चौ.मीटरच्या ६२४ सदनिका), केएच-२ (३७ चौ. मीटरच्या ५१२ सदनिका), केएच-३ (५७ चौ. मीटरच्या ४७६ सदनिका आणि केएच-४ (९१ चौ. मीटरच्या ५३४ सदनिका) यांचा समावेश आहे. केएच-१ आणि केएच-२ प्रकारच्या सदनिका मूळात अल्प उत्पन्न गटासाठी आणि केएच-३ आणि केएच-४ प्रकारच्या सदनिका मध्यम उत्पन्न गटासाठी आहेत. प्रकल्पाचा एकूण अंदाजित खर्च रू. १४०.०० कोटी इतका आहे.

नवीन सामुहीक गृह निर्माण योजना:- उलवे येथील सेक्टर-१९ए मधील उन्नती (युएल-१ आणि युएल-२ प्रकारची) योजना

विषयांकित काम दिनांक १०-८-२००९ रोजीच्या ठराव क्र. १०१७२ द्वारे मेसर्स बीडीएससीटी प्रा.लि. यांना ६५.९७ कोटी रुपयांना देण्यात आले. कामाच्या व्याप्तीमध्ये प्रत्येकी ३२४.९ चौ.फुट आणि ४५४.३५ चौ.फुट क्षेत्रफळाच्या अनु. युएल-१ आणि युएल-२ प्रकारच्या सदनिकांचे संकल्पचित्र आणि बांधकाम करण्याचा समावेश आहे.

अशा प्रकारच्या ४२ इमारतींपैकी २५ इमारती युएल-१ आणि १७ इमारती युएल-२ प्रकारच्या आहेत. एकुण १३४४ सदनिकांचे बांधकाम करण्यात आलेले आहे. हे काम दिनांक २८/०८/२००९ रोजी प्रदान करण्यात आले. हे काम पुर्ण करण्याची प्रारंभीची तारीख २७/०५/२०११ होती. तथापि या कामाच्या कंत्राटाची मुदत दिनांक ३१/१०/२०११ पर्यंत वाढविण्यात आलेली होती. एजन्सीने हे काम सर्वतोपरी दिनांक ३१/१०/२०११ रोजी पुर्ण केले. वाढीव खर्चाशिवाय पुर्णत्वाचा खर्च ६७.५४ कोटी रुपये आहे.

एजन्सीला ७.५४ कोटी रुपये वाढीव खर्चापोटी प्रदान करण्यात आले. बऱ्याचशा सदनिका खरेदीदारांना देण्यात आलेल्या आहेत. आणि जवळपास १५० कुटुंबे सध्या रहात आहेत. वर्ष २०१४-१५ साठी या योजनेस ४७.४१ कोटी रुपये खर्च आला.

विशेष आर्थिक क्षेत्र:

पार्श्वभूमि:

भारत सरकारने आयात-निर्यात धोरण १९९७-२००२ मध्ये पुनरिक्षण करुन वर्ष २००० मध्ये विशेष आर्थिक (सेझ) क्षेत्राची संकल्पना मांडली. त्यानुसार सिडकोने नवी मुंबईतील द्रोणागिरी, उलवे, कळंबोली आणि आरपीझेड या तीन प्रभागांमधील ४३७७ हेक्टर जागेवर विशेष आर्थिक क्षेत्र (सेझ) उभारण्याच्या प्रस्तावावर चर्चा केली. वाणिज्य आणि उद्योग मंत्रालय, भारत सरकारने नवी मुंबई येथे विशेष आर्थिक क्षेत्र उभारण्यास तत्वत: मंजुरी (०५/०५/२०००) दिली. तसेच दिनांक १५ फेब्रुवारी, २००२ रोजी नवी मुंबई विशेष आर्थिक क्षेत्र प्रकल्पास औपचारिक मंजुरी दिली.

महाराष्ट्र सरकारने नवी मुंबईमध्ये विशेष आर्थिक क्षेत्र विकसित करण्यासाठी सिडकोची विभागीय एजन्सी (१५/०९/२००२) म्हणून नेमणुक केली आणि सार्वजनिक खाजगी सहभागाद्वारे खाजगी भागिदाराबरोबर बहुसंख्य भागधारकांची तरतुद करुन नवी मुंबई सेझ प्रकल्प हाती घेण्याचे (११/०९/२०००) सिडकोला निर्देश दिले.

योग्य गुंतवणुकदाराची निवड :-

त्यानुसार योग्य गुंदवणुकदारांची निवड करण्यासाठी, सिडकोने जागतिक निविदा मागविल्या आणि त्यातुन मेसर्स स्किल लेड कन्सोर्शिअम यांची या प्रकल्पासाठी निवड केली. मेसर्स स्किल लेड कन्सोर्शिअमने मेसर्स द्रोणागिरी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. (मेसर्स डीआयपीएल) या कंपनीची स्थापना केली. नवी मुंबई विशेष आर्थिक क्षेत्र प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी डीआयपीसी आणि सिडको यांनी अनुक्रमे ७४ टक्के आणि २६टक्के प्रमाणात भागीदारी करुन मेसर्स नवी मुंबई सेझ प्रा. लि. (मेसर्स एनएम सेझ प्रा. लि.) या विशेष उद्देश कंपनीची स्थापना केली.

सिडकोने मेसर्स डीआयपीएलशी आणि मेसर्स नवी मुंबई सेझ प्रा.लि.शी भागधारक (२१/०८/२००४) करार केलेला आहे आणि मेसर्स नवी मुंबई सेझ प्रा. लि. शी (२९/०८/२००४) विकास करार केलेला आहे.

प्रकल्प भूमि :

नवी मुंबई सेझ प्रकल्प २१४० हेक्टर परिसरामध्ये विकसित करण्यात येत आहे. आर.एफ.पी. मध्ये आणि करारामध्ये केलेल्या तरतुदीनुसार प्रकल्प भूमि नवी मुंबईच्या तीन प्रभागांमध्ये पसरलेली आहे.

भू वाटप :

कंपनीने ''मागील अटींची'' यशस्वीरित्या पुर्तता केल्यानंतर सिडकोने द्रोणागिरी, कळंबोली आणि उलवे येथील १८४२ जागा कंपनीकडे सुपुर्द केली. महाराष्ट्र शासनाने नवी मुंबई सेझ प्रकल्प जागेसाठी सिडकोमार्फत स्थापन करण्यात आलेल्या कंपनीची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणुन घोषणा केली.

विकासात्मक आणि पणनात्मक महत्त्वपुर्ण टप्पे आणि विस्तार :

विकासात्मक करारामध्ये विविध टप्प्यांवर जागा सुपुर्द करण्याचे ठरविण्यात आले. तथापि, सेझ अधिनियमामध्ये/नियमावलीमध्ये दिलेल्या अटींमुळे कंपनीला द्रोणागिरी येथे बहुउत्पादन सेझची निर्मिती करण्यासाठी ज्यादा जमिन देण्यात आली.

करारनाम्यानुसार आणि दिनांक ०४/१२/२००६ रोजीच्या ठरावानुसार कंपनीला दिनांक २६/०९/२०१० रोजी किंवा त्यापुर्वी ४५० हेक्टर जागा विकसित करण्याचे पहिले विकासात्मक उद्दीष्ट साध्य करावयाचे होते.

तथापि -

पुढील दिलेल्या कारणांमुळे विकासाचे महत्त्वपुर्ण टप्पे पार करता आले नाही.

१. राज्य सेझ अधिनियम नव्याने अधिनियमित न होणे.

२. जागतिक मंदी

३.महाराष्ट्र राज्य सेझ अधिनियमाची व्याख्या आणि अधिनियम अंमलात येण्याची तारीख बदलुन हा अधिनियम नव्याने अधिनियमित करण्याच्या तारखेपर्यंत आर्थिक लाभ न झाल्याने गुंतवणुकदार/युनिट धारक यांना आकर्षित करता आले नाही. एचपीसीने/मंत्रिमडंळाने केलेल्या शिफारशी काळजीपुर्वक विचारात घेऊन शासनाने काही अटींवर विकासात्मक व पणनात्मक उद्दीष्ट्ये गाठण्यासाठी २ वर्षांची मुदत वाढ दिलेली आहे.

तथापि, महत्त्वपुर्ण तारखा वाढवुन देखिल कंपनीने नवी मुंबई सेझ प्रकल्पाच्या विकासाचे काम पुर्ण केले नाही. आणि म्हणुन कंपनीने दिनांक ११ ऑगस्ट, २०१२ रोजीच्या पत्राद्वारे पुन्हा मुदतवाढ देण्याची विनंती केली.

द्वितीय मुदतवाढीसाठी कंपनीची विनंती :-

कंपनीने आपल्या पत्रामध्ये दिलेल्या मुदतवाढीत उद्दीष्ट्ये साध्य न झाल्याची कारणे दिलेली आहेत, ती पुढीलप्रमाणे:-

★ महाराष्ट्र सेझ अधिनियम नव्याने अधिनियमित न होणे.

★ विशेष आर्थिक क्षेत्र - नियामक आणि आर्थिक प्रवाहामध्ये रुतलेले असणे.

★ कंपनीला भाडेपट्टयाने दिलेल्या जागेचे भू-अभिलेख अद्ययावत नसणे.

★ सेझ कराधान अमदानीतील बदल.

★ या प्रदेशातील मुख्य पायाभूत प्रकल्पांचा विकास होण्यास झालेला विलंब.

★ द्रोणागिरी, कळंबोली आणि उलवे प्रभागातील नवी मुंबई सेझ प्रभागवार अडथळे.

तसेच कंपनीने एचपीसी / शासन यांच्या विचारार्थ आणखी दोन पर्याय प्रस्तावित केले.

१. ''अंमलात येण्याची तारीख" जोडुन उद्दीष्ट साध्य करणे.

अ) महाराष्ट्र सेझ अधिनियम नव्याने अधिनियमित करणे.

ब) भू अभिलेख अद्ययावत करणे.

क) सिडको/राज्य शासन यांनी भू पातळी समस्यांबाबत निर्ण घेणे.

२. घरगुती बाजारासाठी जागा खुली करणे.

निर्गमन मार्ग

महाराष्ट्र औद्योगिक धोरण फेब्रुवारी, २०१३ मध्ये जाहीर झाल्यानंतर, कंपनीने सिडकोशी संपर्क साधला आणि या नवीन धोरणाचा लाभ उठविण्याची इच्छा व्यक्त केली. या नवीन धोरणामध्ये महाराष्ट्रातील बंद पडणाऱ्या सेझसाठी निर्गमन मार्गाची आणि विशेष आर्थिक क्षेत्र जाहीर न करण्याची आणि धोरणात्मक तरतुदीनुसार ''एकात्मिक औद्योगिक क्षेत्र" (दोन ए) मध्ये परिवर्तित करण्याची तरतुद करण्यात आलेली आहे. या बाबतीत योग्य ते निर्देश देण्याची महाराष्ट्र शासनास विनंती करण्यात आली. महाराष्ट्र शासनाचा निर्णय प्रतिक्षाधिन आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ (एनएमआयए) प्रकल्प.

१. **पार्श्वभूमि :-**

मुंबई ही भारत देशाची आर्थिक आणि वाणिज्यिक राजधानी असल्यामुळे या ठिकाणी विमानतळाच्या उच्च दर्जाच्या सुविधा असणे आवश्यक आहे. सध्याच्या मुंबई विमानतळाची क्षमता ३० दशलक्ष प्रवासी प्रती वर्ष (एमपीपीए) इतकी आहे. आणि वाढत्या हवाई प्रवाशांच्या मागणीनुसार हवाई, जमिन आणि शहरी सुविधांची क्षमता वाढविण्यास अडचणी भासत आहेत. मुंबई महानगर प्रदेशातील हवाई प्रवासाची मागणी वेगाने वाढत असुन वर्ष २०३० पर्यंत हवाई प्रवाशांमध्ये १०० दशलक्ष प्रवासी प्रती वर्षे इतकी वाढ होण्याची अपेक्षा आहे. या अपेक्षित हवाई प्रवासाच्या मागणीची पुर्तता करण्यासाठी नागरी विमानचालक मंत्रालयाने (एमओएलए) नवी मुंबईमध्ये ग्रीनफिल्ड विमानतळ विकसित करण्यासाठी तत्वत: मंजुरी दिलेली आहे.

नवी मुंबई विमानतळ सार्वजनिक-खाजगी भागिदारीतून (पीपीपी) सरकारला जाणार आहे. त्यासाठी सिडकोच्या सामान्य अंशदानासह विशेष उद्देश कंपनी (एसपीपी) ची स्थापना करण्यात येणार आहे.

२. **मान्यता :-**

नागरी विमान चालन मंत्रालयाकडून मुख्य प्रकल्पाच्या मान्यता घेणे सुरू आहे. पर्यावरण व वन मंत्रालयाकडून पर्यावरण व सीआरझेड विषयक मंजुरी आणि संरक्षण मंत्रालयाकडून संरक्षण विषयक मान्यता घेणे सुरू असून पहिल्या टप्प्याची वन व वन्यजीवन निपटाऱ्याविषयक मंजुरी प्राप्त झालेली आहे. माननीय उच्च न्यायालयाने नुकतीच विमानतळ क्षेत्रातील मॅनग्रोव्हज निपटाऱ्याविषयक परवानगी दिलेली आहे.

३. **प्रकल्पाचे तपशिल :-**

३.१ **ठिकाण :-**

प्रस्तावित विमानतळ नवी मुंबईच्या भौगोलिक केंद्रातील पनवेलजवळ राष्ट्रीय महामार्ग क्र. ४बी ला लागून आणि मुंबईच्या विद्यमान विमानतळापासून सुमारे ३५ कि.मी. अंतरावर वसलेले आहे. प्रस्तावित विमानतळाच्या सिमेवर असलेला चार पदरी राष्ट्रीय महामार्ग पुर्वेकडून विमानतळाकडे जाणारा मुख्य मार्ग आहे तसेच विमानतळाच्या पश्चिम सिमेवरुन आम्र मार्ग हा चार-पदरी काँक्रिटचा रस्ता जातो.

३.२ **ठळक वैशिष्टये :-**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचा मुख्य परिसर ११६० हेक्टर इतका आहे. या विमानतळामध्ये दोन समांतर आणि स्वतंत्र धावपट्टया असतील. या धावपट्यावरून एकाचवेळी आणि स्वतंत्र्यपणे विमानांचे प्रचालन करता येईल. तसेच धावपट्टयांच्या दोन्ही बाजूस टॅक्सी वेजची योजना असेल. नवीन मोठी विमाने जसे ए३८०/बी ७४७-सी यासारखी विमाने राहतील अशी विमानतळाची रचना करण्यात आलेली असून त्यामध्ये आयसीएओ एअरोड्रोम संकेत ४एफचे पालन करण्यात आलेले आहे. प्रस्तावित विमानतळामुळे वर्ष २०१७ पर्यंत पहील्या टप्प्यामध्ये १० दशलक्ष प्रवासी प्रती वर्ष इतक्या प्रवाशांची सोय होण्याची अपेक्षा असून त्यामध्ये वाढ होऊन वर्ष २०२० पर्यंत २५ दशलक्ष प्रवासी प्रती वर्ष आणि वर्ष २०१५ पर्यंत ४५ दशलक्ष प्रवासी प्रती वर्ष तसेच वर्ष २०३० पर्यंत ६० दशलक्ष प्रवासी प्रती वर्ष इतकी या विमानतळाची क्षमता वाढेल.

३.३ **प्रकल्प खर्च :-**

चार टप्प्यांमध्ये विभागलेल्या या विमानतळ प्रकल्पाचा मुळ खर्च सुमारे रु. १४,५७४ कोटी इतका अपेक्षित आहे. यातील पहील्या टप्प्याचा खर्च अंदाजे रु.६,१४७ कोटी इतका असून त्यामध्ये जमीनीचे पुन:प्रापण/भराई आणि अति उच्च दाबाच्या पारेषण वाहिन्या हलविणे यासारख्या पूर्व-विकसित कामांचा समावेश आहे. वित्तीय सुसाध्यतेमधील एकेरी टिल (एईआरएनुसार) सह सुमारे १४ टक्के आणि हायब्रिड टिलसह सुमारे २० टक्के समन्याय आयआरआर दिसून येते.

३.४ **प्रकल्पाचे लाभ :-**

नवी मुंबई विमानतळ आपल्या देशाच्या आणि महाराष्ट्र राज्याच्या व विशेषत: मुंबई, नाशिक, पुणे व अहमदनगर पट्ट्याच्या एकंदर विकासासाठी एक शक्तिशाली यंत्र म्हणून कार्य करील. उत्कृष्ट विमान चालन सुविधा उपलब्ध झाल्यामुळे मुंबई महानगर प्रदेशामध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक गुंतवणूक होईल आणि व्यवसाय वाढीस चालना मिळेल.

४.० **प्रकल्प विषयक कामांची स्थिती:-**

या प्रकल्पामध्ये विविध प्रकारच्या कामांचा समावेश आहे. या कामांमध्ये प्रकल्प क्षेत्रातील डोंगराळ भागांची छटाई करून जमिन विकसित करणे, भराई करणे, उल्वे नदीचा मार्ग बदलणे आणि प्रकल्प क्षेत्रातून जाणाऱ्या अति उच्च दाबाच्या विद्युत (ईएचव्हीटी) वाहीन्या हलविणे इत्यादी कामांचा समावेश आहे. तसेच टप्प्याटप्प्याने विमानतळाचा विकास करणे आणि त्यांचे कार्यान्वयन करणे यांचा देखिल समावेश आहे. त्याचप्रमाणे विमानतळ व्यवसायास पाठींबा देणाऱ्या क्षेत्राचा विकास करावयाचा आहे व रस्ते, जोडमार्ग व सोयी यासारख्या क्षेत्र बाह्य भौतिक पायाभूत सुविधांचा देखिल विकास करावयाचा आहे.

४.१ जमिनीची आवश्यकता:-

प्रकल्पाचे एकूण क्षेत्रफळ २२६८ हेक्टर इतके असून त्यामध्ये मुख्य विमानतळ क्षेत्र, पुनर्वसन व पुनर्स्थापना जागा, मॅनग्रोव्ह पार्क, विमानतळाची सहाय्यभूत कामे यांचा समावेश आहे. त्यापैकी ६७१ हेक्टर खाजगी जागेचे संपादन करावयाचे आहे आणि २५ हेक्टर शासकीय जागेचे हस्तांतरण करावयाचे आहे. कन्सेशनेअरना प्रदान करावयाचे मुख्य विमानतळ क्षेत्रफळ ११६० हेक्टर इतके असून त्यापैकी सध्या ८५३ हेक्टर (७४ टक्के) जागा कब्जामध्ये आहे. अन्य सरकारी मालकीची १५ हेक्टर (१ टक्के) जमिन सिडकोकडे हस्तांतरीत करावयाची आहे आणि २९२ हेक्टर (२५ टक्के) खाजगी जमिनीच्या संपादनाची प्रक्रीया सुरु आहे. त्यासाठी भूसंपादन अधिनियमान्वये अधिसूचना जारी करण्यात आलेली आहे. संमती निवाड्याद्वारे जागा संपादीत करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. विमानतळाजवळ विकसित करण्यात येणाऱ्या आधुनिक पुष्पक नगर वसाहतीमध्ये आर्थिक भरपाई करण्याऐवजी जागेच्या विकसित भूखंडाचे वाटप करणे ही खाजगी जमिनी संपादन करण्यासंबंधीच्या प्रस्तावित प्रतिकृतीमागची भूमिका होती.

मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन आणि विमानतळ प्रकल्प बाधितांचे प्रतिनिधी यांची दिनांक ११ नोव्हेंबर २०१३ रोजी उच्च स्तरीय बैठक झाली आणि या बैठकीमध्ये सिडकोने तयार केलेली भूसंपादन प्रतिकृती तसेच पुनर्वसन व पुनर्स्थापना धोरणाचे लाभाधिकारी यावर सविस्तर चर्चा करण्यात आली आणि या चर्चेला प्रकल्पग्रस्तांनी मान्यता दिली. वेगवेगळ्या लाभाधिकाऱ्यास संयुक्त मोजमाप आणि सर्वेक्षण पार पाडण्याचे काम देण्यासाठी लवकरच पुढील कार्यवाहीस प्रारंभ करण्यात येईल.

४.२ पुनर्स्थापना आणि पुनर्वसन (आर ॲन्ड आर):-

प्राथमिक अंदाजावरून असे दिसून येते की, विमानतळ प्रकल्पामुळे अंदाजे ३५०० कुटुंबांचे पुनर्वसन करावे लागेल. सिडकोने केंद्र सरकारच्या आणि राज्य सरकारच्या धर्तीवर प्रारूप पुनर्स्थापना व पुनर्वसन धोरण तयार केलेले आहे आणि त्याबाबत प्रकल्पग्रस्तांशी चर्चा केलेली आहे. विमानतळाच्या सानिध्यातील दोन पुनर्स्थापना आणि पुनर्वसन जागेच्या विकासावरील आरंभीच्या कामांचा शुभारंभ करण्यात आलेला आहे.

४.३ अतिउच्च दाबाच्या विद्युत वाहीन्या हलविणे:-

मेसर्स टाटा पॉवर आणि मेसर्स एमएसईटीसीएल यांच्या अतिउच्च दाबाच्या विद्युत वाहीन्या विमानतळ क्षेत्रातून जातात आणि त्या हलविणे गरजेचे आहे. एमएसईटीसीएल यांनी आशावादी पंक्ती रचनेचे सुसाध्य सर्वेक्षण केलेले आहे. डीजीसीएने अलिकडेच विमानतळ क्षेत्रापासून दूर उंचावरून उपरी पद्धतीने अति उच्च दाबाच्या विद्युत वाहीन्या हलविण्यास मंजुरी दिलेली आहे. एमएसईटीसीएल तपशिलासह तपशिलवार प्रकल्प अहवाल सादर करणार आहे. या दोन्ही विद्युत कंपन्यांशी सल्ला मसलत करून कार्यान्वयन आराखडा तयार करण्यात येईल.

४.४ मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या निपटाऱ्याविषयक मान्यता (मॅनग्रोव्हज):-

मा. मुंबई उच्च न्यायालयामध्ये अतिरिक्त शपथपत्र दाखल करण्यात आले. दिनांक २९ ऑक्टोबर २०१३ रोजी सुनावणी घेण्यात आली आणि सिडकोला विमानतळ प्रकल्प क्षेत्रातून मॅन्ग्रोव्हज हटविण्यासाठी परवानगी देण्यात आली.

४.५ पर्यावरण आणि सीआरझेड निपटाऱ्याविषयक मान्यता - पर्यावरण व वन मंत्रालय:-

नवी मुंबई विमानतळ प्रकल्पावर इएसी, एमओईएफ यांनी सविस्तर चर्चा केली आणि नोव्हेंबर २०१० मध्ये पर्यावरण व सीआरझेड निपटाऱ्याविषयक मान्यता दिली. परंतु, विमानतळाचे बांधकाम करताना आणि प्रचालन करण्याच्या दरम्यान पर्यावरण व सागरी नियामक क्षेत्र प्राधिकरणाने विविध प्रकारच्या अटी घातल्या. त्यानुसार सिडको प्रकल्पाच्या योग्य त्या टप्प्यावर या प्राधिकरणाच्या विविध अटींचे पालन करीत आहे.

५.० प्रमुख सल्लागारांनी तयार केलेला बृहद आराखडा आणि तपशिलवार प्रकल्प अहवाल :-

प्रमुख सल्लागार मेसर्स लुईस बर्गर ग्रुप युएसए (एलबीजी) यांनी सुकाणु समिती (एससी), नागरी विमानचालन मंत्रालय, एएआय आणि सिडको यांच्या निरिक्षणांच्या आधारे बृहद आराखडा दस्तऐवजामध्ये सुधारणा केलेली आहे आणि प्रारूप तपशिलवार प्रकल्प अहवाल (डीपीआर) व प्रारूप व्यवसाय आराखडा सादर केलेला आहे. प्रमुख सल्लागाराने प्रारूप व्यवसाय आराखडा सादर केलेला असून त्याची तपासणी सुरु आहे.

६.० प्रकल्प मान्यता यंत्रणा आणि आरएफक्यूला मंजुरी :-

नागरी विमानचालन मंत्रालयाने मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली आणि सभासद म्हणून प्रधान सचिव, नगरविकास विभाग, वित्त आणि विमान चालन विभाग, महाराष्ट्र शासन व्यवस्थापकीय संचालक आणि सहव्यवस्थापकीय संचालिका, सिडको, सह सचिव, नागरी विमानचालन मंत्रालय आणि अध्यक्ष, एएआय, भारत सरकारचे प्रतिनिधी यांचा समावेश असणाऱ्या प्रकल्प संनियंत्रण आणि कार्यान्वयन समिती (पीएमआयसी) ची प्रस्थापना करणारा आदेश नोव्हेंबर २०१२ मध्ये जारी केलेला आहे. संदर्भित शर्तीमध्ये केंद्र शासनाच्या अंतिम मंजुरीसाठी बोली आणि व्यवहार दस्तऐवज सादर करण्याच्या समावेशासह सर्व प्रकल्प दस्तऐवज तयार करणे, बोली प्रक्रीयेचे आयोजन करणे आणि मूल्यांकन करणे व प्रकल्प प्रदान करण्यासाठी राज्य मंत्री मंडळाला शिफारसी करणे इत्यादींचा समावेश आहे.

प्रकल्प संनियंत्रण आणि अंमलबजावणी समितीच्या आजमितीपर्यंत प्रकल्प विषयक विविध कामे शिघ्र गतीने करण्यासाठी प्रारूप आरएफक्यू दस्तऐवजावर विस्तारपुर्वक चर्चा करून इतर बोली दस्तऐवज केंद्र शासनाच्या मंजुरीस्तव सादर करण्यासाठी सहा बैठका घेण्यात आलेल्या आहेत. जुलै, २०१३ मध्ये घेण्यात आलेल्या पीएमआयसीच्या ५व्या बैठकीमध्ये व्यवस्थापकीय संचालक सिडको, प्रधान सचिव (नवि), प्रधान सचिव (परिव्यय), सह सचिव, नागरी विमानचालन मंत्रालय, सहव्यवस्थापकीय संचालिका, सिडको आणि निमंत्रित एमसी (मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण), अध्यक्ष, एएआय व पीपीपी तज्ञ महाराष्ट्र, एडीबी यांचा समावेश असणारी उपसमिती प्रस्थापित करून प्रारूप आरएफक्यू दस्तऐवजाचे तपशिलवारपणे परिक्षण करण्याचे ठरविण्यात आले.

उपसमितीने घेतलेल्या निर्णयांचा समावेश असणारे सुधारित प्रारूप आरएफक्यू दस्तऐवज दिनांक २१ नोव्हेंबर २०१३ रोजी घेण्यात आलेल्या पीएमआयसी च्या ६व्या बैठकीमध्ये सादर करण्यात आले होते आणि त्यावर सविस्तर चर्चा करून त्यांना मान्यता देण्यात आली होती. पीएमआयसीने मान्यता दिलेले अंतिम आरएफक्यू दस्तऐवज मंजुरीस्तव नागरी विमानचालन मंत्रालयाकडे सादर करण्यात आलेले आहेत.

७.० महत्वपूर्ण आणि आवश्यक भागीदाराची निवड :-

विमानतळाचा सार्वजनिक खाजगी भागिदारीतून विकास करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या महत्वपूर्ण भागिदाराची जागतिक बोली प्रक्रियेद्वारे निवड करता येईल. विमानतळ विशेष उद्देश वाहन कंपनीसह त्यामध्ये सिडकोचा २६ टक्के समभाग असण्याची अपेक्षा आहे. प्रारंभीच्या प्रती वर्षी १० दशलक्ष प्रवासी क्षमता असणाऱ्या विमानतळाचा पहिला टप्पा वर्ष २०१७ ला कार्यान्वित होण्याची अपेक्षा आहे. अंतिमत: वर्ष २०३० पर्यंत प्रती वर्षी ६० दशलक्ष प्रवासी क्षमतेच्या विमानतळाचे बांधकाम करण्यात येईल.

द्रोणागिरी येथील ट्रक टर्मिनलचा बांधा, वापरा आणि हस्तांतरीत करा. (बीओटी) या तत्वावर विकास करणे :-

द्रोणागिरी प्रभागातील गोदाम (सेक्टर-२) क्षेत्रातील ट्रक टर्मिनलचा विकास करण्यासाठी ८.१ हेक्टर भूखंड निश्चित करण्यात आलेला आहे. या प्रकल्पासाठी मेसर्स आयएल अँड एफएस ट्रान्सपोर्ट नेटवर्क लिमिटेड (गतकालीन सीटीएनएल) यांची सल्लागार म्हणुन नेमणुक करण्यात आली होती. या क्षेत्रामध्ये वाहतुकीची मागणी वाढत असुन हा प्रकल्प बांधा, वापरा आणि हस्तांतरीत करा या तत्वावर जरी साकार करावयाचा असला तरी येथील जमिन दलदलीची असल्यामुळे या जमिनीची सुधारणा करण्यासाठी येणाऱ्या खर्चामुळे प्रकल्पाच्या एकुण खर्चामध्ये वाढ होईल. आर्थिक सुसह्यतेच्या विश्लेषणातुन असे दिसुन येते की हा प्रकल्प अंदाजित खर्चाच्या सुमारे ३० टक्के अर्थसहाय्य केल्यास बांधा, वापरा आणि हस्तांतरीत करा या तत्वावर प्रत्यक्षात साकार करता येऊ शकेल.

द्रोणागिरी येथील किनारपट्टी मार्ग :-

या अडथळा विरहीत किनारपट्टी मार्गावरून जे.एन.पी.टी., द्रोणागिरी आणि उरण येथे अगदी कमी वेळात पोहोचणे शक्य होणार आहे. सिडकोला उरणमध्ये ८.५ कि.मी. किनारपट्टी मार्गाचे बांधकाम करण्यासाठी वन आणि पर्यावरण मंत्रालय, महाराष्ट्र शासन यांनी पर्यावरण निपटाऱ्याविषयक मान्यता दिलेली होती. जेएनपीटी मार्गावर वाहतूकीची गर्दी करण्याऐवजी बंदर परिसराकडे जाण्याकरिता या मार्गावर महत्वाच्या ठिकाणी येण्याजाण्याचे मार्ग राहतील. प्रकल्पाचा एकुण खर्च रू.२१,४१५ लाख इतका असेल.

खारघर येथील स्कायवॉक :-

पदपथिकांच्या सोयीसाठी, परिवहन विभागाने खारघर प्रभागातून रेल्वे स्थानकापर्यत (स्काय वॉक) गगनसेतु बांधण्याचे प्रस्तावित केलेले आहे. या गगनसेतुमुळे सायन-पनवेल दृतगती मार्ग व अन्य मार्ग विना अडथळा ओलांडणे पदपथिकांना सोईचे होणार आहे. गगनसेतुची एकुण लांबी १.६२५ किमी आहे. या गगनसेतुला ९ ठिकाणी जिने आणि ३ ठिकाणी रॅम्प्स आहेत. खारघर रेल्वे स्थानकामध्ये या गगनसेतुला सरकता जिना लावण्यात आलेला आहे. गगनसेतुचे बांधकाम पुर्ण झालेले असुन श्री. शरदचन्द्र पवार, मा. केन्द्रीय कृषी मंत्री आणि श्री. पृथ्वीराज चव्हाण, मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते अन्य मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये दिनांक २४/१२/२०१२ रोजी हा गगनसेतु पदपथिकांना खुला करण्यात आला.

सीवुड्स रेल्वे स्थानक :-

सीवुड्स रेल्वे स्थानक हे नेरूळ / बेलापुर - उरण रेल्वेमार्गाचा एक भाग आहे. मानखुर्द - पनवेल रेल्वे मार्गावरील किमान सुविधांसह हे स्थानक यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आले आणि दिनांक १२-६-२००४ रोजी कार्यान्वित करण्यात आले. वाणिज्यिक वापराद्वारे सीवुड्स रेल्वे स्थानक संकुलाचा विकास करण्याचे प्रस्तावित करण्यात आलेले आहे. सीवुड्स रेल्वे स्थानक संकुलामध्ये खालील बाबींचा समावेश आहे:-

- ★ फलाटांच्या समावेशासह रेल्वे स्थानकाचा विकास.
- ★ रेल्वे कार्यालये
- ★ प्रवासी सुविधा जसे वाहनतळ, रिक्षा स्टँड इत्यादी.
- ★ विद्युत उपकेद्रांचा विकास
- ★ दक्षिण बाजूकडील ३०.०मीटर विस्तृत रस्त्याकडील भूखंडाच्या सिमेला लागुन असलेल्या पॉवर कॉरिडॉरमध्ये उच्च दाब इएचव्ही (२२०केव्ही) वीज पारेषण मार्गासाठी १०मी. रूंद आणि २मी.खोल आरसीसी केबल ट्रेन्च.

या पार्श्वभूमीवर, सिडको १.५ अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशकांसह १६.५ हेक्टर परिसरावर सीवुड्स रेल्वे स्थानक विकसित करण्याचा विचार करीत आहे. या विकासामुळे २५.०० लाख चौ.फुटाचा संभाव्य विकास होईल. विद्यमान स्थानक विकासावरील मोकळ्या आकाशाचा विकासासाठी वापर करता येईल. सीवुड्स रेल्वे स्थानकातील प्रस्तावित केलेल्या एकात्मिक संकुलासाठी बाजाराच्या मागणीनुसार विश्लेषण करण्यासाठी आणि विविध सुसाध्यतेचा अभ्यास करण्यासाठी सल्लागार म्हणुन मेसर्स क्रिसिल इन्फ्रास्ट्रक्चर ॲडव्हायजरी यांची नेमणुक करण्यात आली होती. या स्थानकासाठी बोली स्विकारण्यात आल्या आणि उच्चतम बोलीदार मेसर्स एल.अँड.टी. यांना रू. १८०९ कोटी इतक्या खर्चाचे काम देण्यात आले.

दिवा पनवेल रेल्वेमार्गावरील पूल (आरओबी) :-

सिडकोने दिवा-पनवेल रेल्वे मार्गावर खालीलप्रमाणे ३ पूल प्रस्तावित केलेले आहेत.

१. **खांदा कॉलनीजवळ :-** या पूलाद्वारे पनवेलचा पूर्व आणि पश्चिम भाग एकमेकांना जोडण्यात येईल. पूलाचा अंदाजित खर्च रू. ३९.८१ कोटी इतका आहे. या पुलाचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर, रेल्वे ओलांडणी क्र. ६६/१-२ बंद करण्यात येईल.

२. **कळंबोली गोदाम संकुलाजवळ :-** या पुलामुळे प्रस्तावित विशेष आर्थिक क्षेत्र (सेझ) जोडला जाईल तसेच औद्योगिक क्षेत्राकडे जाण्यासाठी दुसऱ्या मार्गाची सोय होईल. या पुलाचा अंदाजित खर्च रू.५९.४९ कोटी इतका असून रेल्वे ओलांडणी क्र. ६१/१०-११ साठी या पुलाचे बांधकाम करण्यात येईल.

३. **पेंधर/पांचनन्द येथील पुल :-** या पुलाची खारघरपासून १२.५ टक्के योजनेच्या भूखंडापर्यंतच्या जोडमार्गासाठी आवश्यकता आहे. या पुलाचा अंदाजित खर्च ४४.५७ कोटी रुपये असुन रेल्वे ओलांडणी क्र. ११/सी साठी या पुलाचे बांधकाम करण्यात येईल. या पुलाचे बांधकाम यापुर्वीच सुरु करण्यात आलेले आहे.

वरील पुलांव्यतिरिक्त, १२.५ टक्के योजनेअंतर्गत खारघर पासुन तळोजापर्यंत एक जोडमार्गाचा भाग म्हणुन तळोजा नदीवर आणखी एक पुल बांधण्याचे प्रस्तावित आहे. पुल बांधण्याचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन पुलाचा अंदाजित खर्च ५६.३६ कोटी रुपये आहे.

नेरूळ -उरण रेल्वे मार्गावरील पूल :-

सिडकोने नेरूळ-उरण रेल्वे मार्गावर ३ पुलांचे बांधकाम प्रस्तावित केलेले असून ते खालीलप्रमाणे आहेत:-

१. सीवुड्स येथील शृंखला ३५/९ येथील पुल. या पुलाचा अंदाजित खर्च रू.३०कोटी इतका आहे.

२. एमएसईबी - जीटीपीएसजवळ शृंखला १९,८१७.५ येथील पुल. या पुलाचा अंदाजित खर्च रू. ३९कोटी इतका आहे.

३. उरण रेल्वे स्थानकाजवळ शृंखला २१,०१५ येथील पुल. या पुलाचा अंदाजित खर्च रू.३९ कोटी इतका आहे.

नवी मुंबई नेचर पार्क (एनएमएनपी) :-

या उपवनाचे खारघरपासून नेरूळपर्यंत २०००हेक्टर इतके क्षेत्र आहे. या उपवनाचे आराखडे संकल्पनात्मक टप्प्यावर आहेत. सदर परिसरातील जैव वैविध्यतेचा अभ्यास करण्यासाठी आणि त्यानुसार एनएमएनपी विकसित करण्यासाठी बृहद आराखडे तयार करण्याकरिता बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी (बीएनएचएस) ची नेमणूक करण्यात आलेली आहे. बीएनएचएसने अलिकडेच नेचर पार्कमधील जैव वैविध्यतेच्या सर्व्हेक्षणासाठी आपल्या निरिक्षणांचा अहवाल सादर केला आहे. त्यांनी सादर केलेल्या मार्गदर्शक तत्वांच्या आधारावर सिडको नवी मुंबई नेचर पार्कसाठी बृहद् आराखडा तयार करण्याचे प्रस्तावित करीत आहे.

सेंट्रल पार्क - खारघर :-

या जागेचे क्षेत्र खारघर प्रभागातील सेक्टर-२३, २४ व २५ मध्ये ८० हेक्टर (सुमारे २०० एकर) इतके विस्तारलेले आहे. या सेंट्रल पार्कला लागुनच ४० हेक्टर (१०० एकर) परिसरामध्ये कमाल चटई क्षेत्र निर्देशकांची घरे, शाळा, मंदीरे इत्यादी आहेत. या परिसरामध्ये रोपवाटीका, करमणुकप्रधान क्षेत्रे आणि क्रिडाक्षेत्रे, ॲम्फीथिएटर आणि उपकरण उपवने आहेत. त्याचप्रमाणे आपल्या वैविध्यपुर्ण संस्कृतीचे दर्शन घडविण्यासाठी आणि नवी मुंबईतील रहीवाशांच्या मनोरंजनासाठी अन्य विषयाधारीत क्षेत्र देखिल आहेत.

सेंट्रल पार्कच्या सेक्टर-२३ मध्ये थिमपार्क, भारतीय संगीत वाद्ये, वाटीका, बालक क्रिडा क्षेत्र, रोपवाटीका, योगापार्क, डायसचा समावेश असलेले ॲम्फीथीएटर हरित क्षेत्र, उपहार गृहे, प्रसाधन गृहे, करमणूक प्रधान बगीचे, वॉटर पार्क, जलक्षेत्र आणि जलप्रणाली वाहनतळ, उपहार गृहासाठी तरतुद, फिरते उपहार गृह, क्लब हाऊस त्याचप्रमाणे प्रदर्शन गृहासह प्रवेश इमारत इत्यादींचा समावेश आहे. तसेच या पार्कमध्ये प्रदुषणमुक्त वाहनांची व्यवस्था करता येईल अशी पदपथांची रचना करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे या ठिकाणी म्युझिक सिस्टीम, पीए सिस्टीम, प्रकाश व्यवस्था, सीसीटीव्ही, बीएमसी आणि विविध प्रकारची कारंजी इत्यादींची व्यवस्था करण्यात आलेली आहे. मल प्रक्रिया केंद्रातून प्रक्रिया केलेल्या संपूर्णपणे संगणकीकृत सिंचन यंत्रणेचा या ठिकाणी वापर करण्यात आलेला आहे.

सेंट्रल पार्कच्या सेक्टर-२४ आणि २५ मध्ये जलाशये, पदपथे, कित्येक प्रकारची वनौषधी, रोपांची काचगृहे, फुड प्लाझा, प्रसाधन गृहे, किल्ल्यांचे लहानलहान नकाशे, क्लब हाऊस आणि पार्किंगच्या जागा यांचा समावेश आहे.

प्रवेश इमारतीचे काम देखिल आता पूर्ण झालेले आहे. खारघर प्रभागातील निवासी तसेच आजुबाजुच्या लोकवस्त्या या सुविधेचा विशेषत: सुट्टीच्या दिवशी आस्वाद घेत असतात.

व्हॅली पार्क :-

पुर्व, पश्चिम आणि उत्तरेकडील पारसिक हिल्समुळे सेक्टर-९ मध्ये एक दरी तयार झालेली असून ही दरी ५० हेक्टर पर्यंत पसरलेली आहे. या पार्सिक पर्वत रांगा बेलापूर मधील मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गाच्या लगत असून त्यांची व्हॅली पार्क म्हणून निवड करण्यात आली आहे.

व्हॅलीपार्कचे दिनांक ५ मे, २००६ रोजी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त उद्घाटन करण्यात आले. व्हॅली पार्कमधील नैसर्गिक साधन सामग्रीमुळे तेथील स्थान वनस्पती सृष्टी आणि प्राणी सृष्टीचे प्रमुख अधिवासाचे स्थान बनलेले आहे. बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसायटी (बीएनएचएस) यांना या पार्कमध्ये जवळजवळ ८० पक्षांच्या प्रजाती आढळून आल्या. निसर्गप्रेमींसाठी हे स्थान म्हणजे एक पिकनिकचे ठिकाण बनले आहे. तर पक्षीनिरिक्षकांसाठी हे ठिकाण म्हणजे एक प्रकारे पर्वणीच आहे. तर या ठिकाणचे धबधबे, हायकींग व ट्रेकिंगची ठिकाणे यामुळे ट्रेकर्सना हे ठिकाण आकर्षित करीत असते. तसेच विजय कदम या नामांकित कलावंताने ट्री म्हणुन संबोधला जाणारा एक शिल्पकलेचा वैशिष्ट्यपुर्ण नमुना या ठिकाणी तयार केलेला आहे.

या ठिकाणी अधिकाधिक पक्षांना आकर्षित करून घेण्यासाठी दरीच्या पायथ्याशी असलेल्या विद्यमान जल प्रवाहासोबत लहानलहान डबकीदेखिल विकसित करण्यात येतील आणि बहुसंख्य फळझाडे लावण्यात येतील.

खारघर व्हॅली गोल्फ कोर्स :-

खारघर व्हॅली गोल्फ कोर्स खारघर येथील सेक्टर २२ मध्ये अंशत: विकसित करण्यात आलेले आहे. या ठिकाणी १८ होल गोल्फ कोर्ससी रचना करण्यात आलेली आहे. या गोल्फ कोर्सचे मेसर्स पॅसिफिक कोस्ट डिझायनर ऑस्ट्रेलिया हे रचनाकार असुन ते आंतरराष्ट्रीय दर्जाचे गोल्फ रचनाकार आहेत.

गोल्फ कोर्स १०३ हेक्टर परिसरामध्ये पसरलेला असुन त्यापैकी प्रारंभीच्या ५०.३५ कोटी रुपये विकास खर्चासह ११ होल्स (४५५२ यार्ड लांबीचा) चा ५२.७० हेक्टरवर यापुर्वीच विकास करण्यात आलेला आहे. हा गोल्फ कोर्स जानेवारी २०१३ मध्ये सुरु करण्यात आला. मान्यताप्राप्त कृती आराखड्यानुसार खालील कामे टप्पा १ मध्ये पुर्ण करण्यात आली.

★ संगणीकृत व स्वयंचलित भूमिगत सिंचन पद्धती तसेच नि:सारण यंत्रणा यांची आणि पंप हाऊसची व्यवस्था.

★ वैशिष्ट्ये जसे आंतरराष्ट्रीय मानकांनुसार वृक्ष लागवड, ४७ बंकर्स आणि ६ तलाव यांची नयनरम्य रचना.

★ विविध फलके आणि गोल्फ खेळाची सामग्री यासाह ठिकठिकाणी छोट्या छोट्या मार्गिका.

★ टोरो बनावटीचे गोल्फ कोर्ससाठी देखभाल यंत्र तसेच यामाहा बनावटीचे दोन आसनी/ चार आसनी/ सहा आसनी गोल्फ कार्ट.

★ गोल्फ यंत्रसामग्री आणि गोल्फ कार्ट यांच्या नियमित देखभालीसाठी ९५८ चौ. मीटर जागेवर देखभाल शेड.

★ २२५० चौ. मीटर जागेवर कायमस्वरूपी क्लब हाऊसचे बांधकाम सुरू.

★ जुलै, २०१३ पासुन गोल्फ कोर्सची आयजीयुकडे नोंदणी करण्यात आलेली आहे. टप्पा दोन मध्ये वन भूमि घमोळेपाडा गावाचे पुनर्वसन आणि खाजगी जागेचे संपादन यांच्या अधिन राहुन कन्ट्री क्लब/गोल्फ अकादमी यांच्यासह उर्वरित ७ होल्सच्या गोल्फ कोर्सचा विकास करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

परिवहन आणि दुरसंचार क्षेत्र :-

१. **आम्रमार्ग आणि पीसीबीचे बांधकाम :-**

एनएचएआय, जेएनपीटी यांनी सिडकोबरोबर स्थापन केलेल्या एमजेपीआरसीएल या विशेष प्रयोजन कंपनीद्वारे या प्रकल्पाचे कार्यान्वयन करण्यात येत आहे. पोर्ट जोडमार्ग प्रकल्पातील पॅकेज-दोनचा एक भाग म्हणून पीसीबी आणि एसएच-५४ चा विस्तार करण्याच्या समावेशासह आम्र मार्गाचे बांधकाम करण्यात येत आहे आणि या मार्गाचा खर्च अंदाजे रू. १२७ कोटी इतका आहे.

सिडकोच्या संचालक मंडळाने जास्तीत जास्त रू. २० कोटी इतक्या रकमेच्या आर्थिक सहाय्यास मंजुरी दिलेली आहे. सिडकोने आर्थिक वर्ष २००५-०६ मध्ये ९.०० कोटीचे इक्विटी पेमेन्ट केले होते. आर्थिक वर्ष २०१३-१४ च्या अर्थसंकल्पिय अंदाजपत्रकामध्ये रू. ९.१० कोटी कर्ज देण्याची तरतुद करण्यात आलेली आहे. पीसीबीच्या समावेशासह आम्र मार्गाचे बांधकाम पुर्ण झालेले आहे. रस्त्याच्या विस्तारीकरणासाठी जेथे जमिनीचे संपादन झालेले आहे, अशा ठिकाणी राज्य महामार्ग एसएच-५४ चे विस्तारिकरण देखिल पुर्ण करण्यात आलेले आहे. राज्य महामार्गाच्या उर्वरित पट्ट्यामध्ये रस्त्याच्या विस्तारिकरणाचे काम भू संपादनानंतर सुरु करण्यात येईल. या राज्य महामार्गाचे विस्तारीकरण करण्यासाठी भूसंपादन करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

२. **उलवे येथील सागरी किनाऱ्यावरून जाणारा मार्ग :-**

हा मार्ग प्रस्तावित ट्रान्स हार्बर जोडमार्गासह शिवाजीनगर येथे वळण घेतो आणि जासई येथील टेकडीच्या पायथ्यापासून पुढे जातो. या मार्गाचा जेएनपीटी परिसरातील सीएफसी मार्गापासून प्रारंभ होतो आणि मग विशेष आर्थिक क्षेत्राच्या प्रस्तावित ऑफ शोअर बँकींग (ओबीसी) कडे जाण्यासाठी प्रवेश मार्गाची तरतुद करून उलवे किनारपट्टीवरून धावतो आणि शेवटी आम्र मार्गावरील स्वतंत्र जोडमार्गासह पनवेल खाडीजवळ संपतो. या १२.५ कि.मी. रस्त्याचा तात्पुरता खर्च रू. २५० कोटी इतका असून त्यामध्ये आम्र मार्गावरील एकमेकांना छेदणारी नि:सारण कामे, आम्र मार्गावरील पुल आणि इतर किरकोळ कामे यांचा समावेश आहे. रस्त्याचे आडवे संरेखन करण्यात आलेले आहे आणि उलवे प्रभागातील रस्त्यांच्या जाळ्याशी जोडलेले आहे. मेसर्स फ्रिस्चमन प्रभु (इ.) प्रा. लि. तपशिलवार प्रकल्प अहवाल तयार करीत आहेत.

जेएनपीटी जवळील गव्हाण फाटा आणि करळ फाटा येथे मार्गाची अदलाबदल करण्यासाठी तांत्रिक-आर्थिक सुसह्यता अभ्यास :-

सिडको सल्लागारांच्या मदतीने गव्हाण फाटा येथील राष्ट्रीय महामार्ग-४ बी सह आम्रमार्ग येथे आणि करळ फाट्याजवळील एसएच-५४ सह राष्ट्रीय महामार्ग-४बी येथे मार्गांची अदलाबदल करण्यासाठी तांत्रिक-आर्थिक सुसह्यता अभ्यास करीत आहे. हा अभ्यास मुंबई-जेएनपीटी पोर्ट रोड कं. लि. (एमजे बीआरसीएल) यांच्यामार्फत करण्यात येत आहे. जेएनपीटी यांनी सिडकोला बरोबर घेऊन एमजेपीआरसीएल ही विशेष प्रयोजन कंपनी स्थापन केलेली आहे. या अभ्यासाचा एकूण खर्च रू. २१.९६ लाख इतका असून तो एमजेपीआरसीएलने सिडकोकडे अनामत केलेला आहे. सल्लागारांनी अध्ययनाचा अंतिम अहवाल सादर केलेला आहे. एमजेपीआरसीएल यांनी जोडमार्गं कार्यान्वित करण्यास मंजूरी दिलेली असून एनएचएआय मंडळाकडून पुढील मंजुरी मिळणे बाकी आहे. या जोडमार्गांचा खर्च रू. ३७५ कोटी इतका असून विशेष उद्देश वाहन कंपनीतील भागीदारांशी योग्य त्या आर्थिक प्रतिकृतीबाबत विचारविमर्श करून एमजेपीआरसीएल यांच्यामार्फत या प्रकल्पास अंतिम मंजुरी देण्याचे प्रस्तावित करण्यात आलेले आहे. या जोडमार्गांच्या बांधकामासाठी ''वाहतुकीच्या पायाभूत सुविधांचा विकास'' या शिर्षाखाली अर्थसंकल्पामध्ये तरतुद करण्यात आलेली आहे.

सिडको प्रदर्शन केंद्र, वाशी

सिडकोने वाशी, नवी मुंबई येथील सेक्टर-३०ए मध्ये सिडको प्रदर्शन केंद्राचे बांधकाम करण्याचे नियोजन केलेले आहे. सिडकोने हाती घेतलेला हा एक अत्याधुनिक आणि प्रतिष्ठीत असा प्रकल्प आहे. इंडियन ग्रीन बिल्डींग कौंसिल (आयजीबीसी) यांनी एलईईडी (लिड) च्या अर्हतेसह ही इमारत ग्रीन बिल्डींग (हरीत इमारत) म्हणून प्रमाणित करण्याचे प्रस्तावित केलेले आहे. मुंबई महानगर प्रदेशातील व्यावसायिक सुविधा आणि गुणवत्तायुक्त प्रदर्शनातील कमतरता भरून काढण्याच्या उद्देशाने या प्रदर्शन केंद्राचे बांधकाम करण्यात आलेले असून हरीत/पर्यावरणाशी निगडीत चर्चा सत्रांकरीता आणि कायमस्वरूपी पर्यावरणाशी संबंधित जागृती निर्माण करण्याकरिता हे प्रदर्शन कक्ष म्हणजे एक प्रमुख ठिकाण असेल.

प्रकल्पाची ठळक वैशिष्ट्ये :-

- ★ यामध्ये प्रदर्शन केंद्र (अंदाजे २१,५६२ चौ. मीटर), व्यवसाय केंद्र (अंदाजे ७,५९७ चौ. मी.), पुरक वेश्मिका (अंदाजे ७८० चौ.मी.) आणि फुड कोर्ट (अंदाजे ८२० चौ.मी.) यांचा समावेश आहे.
- ★ प्रदर्शन केंद्रामध्ये दोन भली मोठी प्रदर्शनाची दालने (अंदाजे ५,००० चौ.मी.), एक सार्वजनिक सभागृह (अंदाजे २,६०० चौ. मी.) आणि एक मध्यवर्ती सभागृह यांचा समावेश आहे. तीन स्तरीय व्यवसाय केंद्रामध्ये ७५० आसनांचे एक प्रेक्षागार, स्वागत कक्ष, चर्चा केंद्र, प्रेक्षागार त्याचप्रमाणे धान्य गृहांसह एक भले मोठे बहुउद्देशिय सभागृह इत्यादींचा समावेश आहे. यामधील पुरक वेश्मिकेमध्ये सामाजिक कामकाज आणि अन्य सुविधांसाठी सेमी ओपन संमेलनाची जागा, प्रशासन, प्लाझा आणि देखभाल कार्यालये, फुड कोर्ट, ग्रंथालय यांचा समावेश राहील.
- ★ प्रदर्शन केंद्र आणि व्यवसाय केंद्र यांना जोडणारा रस्त्यावरून जाणारा पुल
- ★ ४५० वाहने राहतील असे वाहनतळ
- ★ एकूण प्रकल्प खर्च: रू. १७०.४९ कोटी

ग्रामविकास भवन:

ग्रामिण विकास आणि जल संवर्धन विभाग (आरडी अँड डब्ल्यूसीडी), महाराष्ट्र शासन हे खारघर येथील सेक्टर-२१ मध्ये त्यांना वाटप केलेल्या भूखंडावर ग्राम विकास भवनांचे बांधकाम करीत आहे. भूखंडाचे एकूण क्षेत्रफळ ४१३८ चौ.मी. आहे. तळमजला अधिक ५ मजले असलेल्या आरसीसी संरचनेच्या या इमारतीमध्ये सर्वोच्च दर्जाचे अंतर्गत सजावटीचे काम करण्यात येणार आहे. ५०० माणसे बसु शकतील इतकी क्षमता असणारे प्रेक्षागार या इमारतीमध्ये असणार आहे. मंत्रालयाने सदर प्रकल्पातील प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे काम सिडकोला दिलेले आहे आणि या प्रकल्पाचा मार्च २०१५ पर्यंतचा सुधारीत खर्च रू. १९.३६ कोटी इतका आहे.

आगरी-कोळी सांस्कृतिक भवन:-

नवी मुंबईचा बराचसा भाग मुळात आगरी आणि कोळी समाजाचा होता, जो शासनाने संपादीत केलेला होता आणि सिडकोला नवी मुंबईच्या विकासासाठी दिलेला होता. या समाजाची स्वतंत्र अशी वेगळी छाप असल्यामुळे ही प्राचीन संस्कृती टिकविणे गरजेचे आहे आणि म्हणुन सांस्कृतिक व अन्य कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी सांस्कृतिक भवन बांधण्याची कल्पना उदयास आली.

आग्री-कोळी सांस्कृतिक भवनाचे बांधकाम दिनांक २५/०१/२०११ रोजी पुर्ण करण्यात आले आणि या भवनाचे महाराष्ट्र राज्याच्या मा. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. या बांधकामाला २२.६० कोटी रुपये खर्च आला. आग्री-कोळी सांस्कृतिक भवनामध्ये ५५० आसनांचे प्रेक्षागार व दुसऱ्या मजल्यावर १,००० आसनांचे बहुउद्देशिय सभागृह आहे. तसेच या भवनामध्ये ग्रंथालयाची सुविधा असलेले भले मोठे वास्तु संग्रहालय प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

या भवनाची सिडकोकडून देखरेख करण्यात येणार असुन या ठिकाणी होणारे सांस्कृतिक आणि अन्य कार्यक्रम पाहुन मुंबई आणि नवी मुंबईचे नागरिक भारावुन जातात त्याचप्रमाणे या भवनातील दर देखिल परवडण्यासारखे आहेत.

नवीन शहर प्रकल्प:-

सिडकोने नवीन औरंगाबाद, नवीन नाशिक, नवीन नांदेड, वाळुज, नागपूर, वसई-विरार उपप्रदेश आणि ओरस येथील सिंधुदुर्ग मुख्यालय वसाहत इ. आपल्या अन्य नवीन शहर प्रकल्पांमध्ये विविध प्रकारची विकास कामे केलेली आहेत आणि करीत आहेत. सिडकोने आतापर्यंत नवीन औरंगाबादमध्ये २१,११६ सदनिका, नवीन नाशिक मध्ये २४,५६९ सदनिका, वाळुज मध्ये ९७२ सदनिका आणि नवीन नांदेड मध्ये ७,८८४ सदनिका बांधलेल्या आहेत. बांधलेल्या एकूण घरांपैकी जवळजवळ ९० टक्के घरे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी आणि अल्प उत्पन्न गटासाठी बांधण्यात आली असून या घरांसाठी हुडकोकडून आर्थिक सहाय्य देण्यात आले आहे.

नवीन औरंगाबाद प्रकल्प जवळजवळ पूर्ण होत आला आहे. शासनाने शासन निर्णय क्रमांक एसीओ/१०९५/७५९/सीआर १६५/वायडी-१०, दिनांक १६-३-२००१ याद्वारे सिडकोच्या देखभाल सेवा औरंगाबाद महानगर पालिकेच्या स्वाधीन करण्यास मंजुरी देखील दिली आहे. यानुसार औरंगाबाद महानगर पालिकेच्या स्थायी समितीने अधिसूचित क्षेत्रातील सिडकोच्या देखभाल सेवा आपल्याकडे घेण्याचे मान्य केले. संचालक मंडळाने दिनांक १०-२-२००६ या तारखेच्या ठराव क्र. ९३८० याद्वारे १ एप्रिल २००६ पासून देखभाल सेवा औरंगाबाद महानगर पालिकेकडे हस्तांतरित करण्यास मंजुरी दिली. सिडको आणि औरंगाबाद महानगर पालिका यांच्यामध्ये दिनांक ३ मार्च २००६ रोजी तशा अर्थाचा करार करण्यात आला. तसेच १ एप्रिल २००६ पासून देखभाल सेवा औरंगाबाद महानगर पालिकेच्या स्वाधीन करण्यात आल्या.

अलिकडेच महाराष्ट्र शासनाने दिलेल्या निर्देशानुसार सिडकोने भूखंड क्र. ३, एन-५, सिडको, नवीन औरंगाबाद येथे ४ कोटी रुपयांचे शासनाकडून आर्थिक सहाय्य घेऊन जवळजवळ रू. २६ कोटी इतक्या एकूण खर्चाच्या अत्याधुनिक अशा प्रेक्षागाराचा विकास केलेला आहे. या इमारतीमध्ये वैविध्यपूर्ण कामांसाठी बरीचशी दालने आहेत. व्यावसायिक नाटकांसाठी भले मोठे प्रेक्षागार प्रायोगिक स्वरूपाच्या गटांसाठी छोट्या आकाराचे प्रेक्षागार आणि काही विशिष्ट भाषिक गटांसाठी प्रेक्षागार आहेत. या परंपरांचा औरंगाबाद शहर एक अविभाज्य भाग आहे आणि सिडकोने ही परंपरा टिकवून ठेवण्याचा एक प्रयत्न म्हणून अत्याधुनिक असे एक प्रेक्षागार प्रस्तावित केलेले आहे.

भल्या मोठ्या ७८३२ चौ.मी. भुखंडावर या प्रेक्षागाराचे बांधकाम करण्यात आलेले आहे. १२०० दर्शकांची क्षमता असणाऱ्या या प्रेक्षागाराचे बांधकामाखालील क्षेत्रफळ ५३४५ चौ.मी. इतके आहे. या प्रेक्षागारामध्ये २५० लोकांची व्यवस्था होईल इतक्या क्षमतेचे एक बहुउद्देशिय सभागृह आहे. त्याचप्रमाणे ५३० चौ.मी. ची भली मोठी प्रदर्शनाची जागा आणि भला मोठा उभा जिना या इमारतीमध्ये आहे. त्याचप्रमाणे मध्यवर्ती वातानुकुलित यंत्रणा असलेल्या प्रेक्षागारामध्ये अत्याधुनिक ध्वनी व्यवस्था आणि प्रकाश व्यवस्था करण्यात आलेली आहे. प्रेक्षागाराचा आधुनिक उन्नत भाग काचेच्या भिंतीनी आणि ग्रॅनाईटने विभुषित केलेला आहे. हे प्रेक्षागार बांधुन पूर्ण झाल्यानंतर ते औरंगाबाद शहरातील विविध सिनेमागृहांचे आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे एक मुख्य ठिकाण बनेल यात शंकाच नाही. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन यांच्या शुभहस्ते दिनांक २१-११-२००८ रोजी या प्रेक्षागाराचे उद्घाटन देखिल करण्यात आलेले आहे आणि ते वसाहतीतील रहीवाशांना वेगवेगळ्या कार्यक्रमांसाठी खुलेसुद्धा करण्यात आले आहे.

वाळुज प्रकल्पांची पुनर्रचना:-

अलिकडेच सिडकोने १०० टक्के जमीन संपादन करण्याच्या पद्धतीचा अवलंब करून व त्याद्वारे प्रकल्प क्षेत्र अतिशय मर्यादित ठेवून वृद्धी केंद्राच्या जवळपास असलेल्या केवळ संभाव्य क्षमता असणाऱ्या क्षेत्राचा समावेश करून प्रकल्पाची पुनर्रचना करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. त्या दृष्टीने मागणी अभ्यास / पुनर्रचना योजना यांचे संकल्पन करण्यात आले आणि सल्लागारांचे सहाय्य घेऊन यावर्षी हा प्रकल्प कार्यान्वित करण्यात येईल. उर्वरित क्षेत्र डी-नोटीकाय केले जाईल.

७० च्या दशकात सिडकोने हाती घेतलेले सर्व नवीन शहर प्रकल्प जवळपास पुर्ण होण्याच्या मार्गावर आहेत. प्रशासकीय व आस्थापना विषयक खर्च भागविण्याच्या दृष्टीने स्वयंनिर्वाही आणि आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य ठरतील अशी नवीन क्षेत्रे विकासासाठी हाती घेणे आवश्यक आहे असे वाटते. शासनाच्या निर्देशानुसार नवीन नांदेड प्रकल्प नोव्हेंबर २००५ मध्ये नांदेड महानगर पालिकेच्या स्वाधीन करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे नवीन औरंगाबाद प्रकल्प सेवांच्या देखभालीसाठी माननीय मंत्री श्री. राजेश टोपे यांच्या हस्ते दिनांक २० फेब्रुवारी २००६ रोजी औरंगाबाद महानगर पालिकेला सुपुर्द करण्यात आला.

वसई-विरार:-

सिडको नगर विकास विभागाच्या महाराष्ट्र शासन राजपत्रानुसार दिनांक १४ मे १९९० पासून वसई-विरार उपप्रदेशाचे विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून काम पहात आहे.

महाराष्ट्र शासनाने दिनांक ०७-०७-२०१० रोजीच्या अधिसूचना क्र. टीपीएस/१२०९/२४२९/१ क्र. २६२/१०/नवि-१२ अनुसार वसई-विरार उपप्रदेशातील सिडकोचे विशेष नियोजन प्राधिकरणाचे काम काढून घेतले आणि हे अधिकार वसई-विरार शहर महानगर पालिकेकडे सोपविले.

दिनांक १-०८-२०१० रोजीच्या ठराव क्र. १०३७५ अनुसार आणि प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांनी दिलेल्या दिनांक २१-१०-२०१० रोजीच्या निर्देशानुसार महामंडळाने दिनांक १ नोव्हेंबर २०१० रोजी वसई-विरार शहर महानगर पालिकेला रू. १८३ कोटीचा धनादेश (पंजाब अँड सिंध बँक, वाशी शाखेचा धनादेश क्र. ९२४९२५) सुपुर्द केला.

पुरस्कार व मान्यता:-

सिडकोने ठाणे आणि पनवेल खाडीच्या बाजुने असलेल्या सागरी जमिनीच्या क्षेत्रात नवी मुंबई हे सुनियोजित शहर विकसित केले आहे. वास्तुशास्त्र आणि नियोजन क्षेत्राशी संबंधित असलेल्या इंडियन आर्किटेक्ट अँड बिल्डर्स या मासिकाने सिडकोच्या या प्रशंसनिय कामगिरीची दखल घेऊन सिडकोला पर्यावरण उभारणीतील लक्षणीय योगदानाबद्दल पुरस्कार दिला आहे. याशिवाय सिडकोला कृषि उत्पन्न बाजार प्रकल्पासाठी कार्यान्वित केलेल्या प्रवर्गातील नागरी नियोजन व संकल्पन यामधील उत्कृष्ट कामगिरीबद्दल पंतप्रधान राष्ट्रीय पुरस्कार (द्वितीय) देण्यात आला आहे.

मानवी संसाधन:-

संघटनात्मक श्रेष्ठत्व साध्य करण्याच्या बाबतीत मानवी संसाधनाचे असणारे मोठे योगदान आपल्या कंपनीने नेहमीच मान्य केलेले आहे. कर्मचाऱ्यांनी सातत्याने उच्च दर्जाची सेवा द्यावी व त्यांनी तंत्रशास्त्रीयदृष्ट्या स्पर्धात्मक राहावे यासाठी सर्व स्तरांवरील कर्मचाऱ्यांना समर्थ करण्याकरिता प्रशिक्षित करण्यावर व त्यांच्या कौशल्याचा स्तर उंचावण्यावर भर देण्यात आला.

हे उद्दिष्ट समोर ठेवून कंपनीचे प्रशिक्षणाचे वार्षिक वेळापत्रक निश्चित करण्यात आले आणि सर्व स्तरावरील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले.

आपल्या कंपनीने नेहमीप्रमाणे कर्मचारी कल्याणाकडे लक्ष पुरविलेले आहे. या संपूर्ण वर्षात कर्मचारी व त्यांचे कुटुंबिय यांना लाभ मिळू शकेल अशा अनेक कल्याणकारी योजना व धोरणे यांची अंमलबजावणी करण्यात आली. या योजनेअंतर्गत दिल्या जाणाऱ्या लाभांचा नियत कालांतराने आढावा घेण्यात आला आणि गरजांची पूर्तता करण्यासाठी त्यात वाढ करण्यात आली.

दिनांक ३१-३-२०१५ रोजी असलेल्या स्थितीनुसार आपल्या कंपनीचे मनुष्यबळ १३०७ इतके होते.

या वर्षात कंपनीच्या सर्व ठिकाणी असलेल्या कर्मचाऱ्यांशी असलेले संबंध सौहार्दपूर्ण व सलोख्याचे राहिले.

विनियामके किंवा न्यायालये किंवा न्यायाधिकरणे यांनी दिलेल्या विशेष आणि महत्वपुर्ण आदेशांचे तपशिल:-

आयकर अधिनियम १९६१ चे कलम १० (२०ए) च्या तरतुदींच्या अनुषंगाने महामंडळाच्या उत्पन्नाला आयकरातुन सूट देण्यात आलेली आहे. हे कलम वित्तिय अधिनियम २००२ अन्वये काढुन टाकण्यात आल्यामुळे आयकर अधिनियमांच्या तरतुदीन्वये महामंडळाचे उत्पन्न आयकरासाठी पात्र धरण्यात येत आहे. आयटीएटी मुंबई न्यायपिठ 'क' यांनी करनिर्धार वर्ष २००६-०७ साठी दिनांक ०८/०८/२०१२ रोजीच्या आयटीए क्र. २९८५/एम/२०१२ मधील आदेशान्वये आणि करनिर्धारण वर्ष २००३-०४, २००४-०५ आली २००५-०६ साठी आयटीएटी, मुंबई यांनी दिनांक १८/१२/२०१४ रोजीच्या आयटीए क्र. ४३७८, ४३७९ आणि ४३८३ /मुंबई /२०१३ मधील आदेशान्वये असा निर्णय दिलेला आहे की, सिडको महामंडळ महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ११३ (३ ए) सह वाचता कलम ११३ (३ ए) आणि कलम ४० (१) (ब) च्या तरतुदींनुसार महाराष्ट्र शासनाचे अभिकरण असल्यामुळे महामंडळाला केवळ अशा प्रकारचे उत्पन्न प्राप्त करण्याच्या उद्देशाने झालेला खर्च वगळुन महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त झालेल्या एजन्सी पारिश्रमिकाच्या संबंधातील आयकर भरावा लागेल.

आयटीएटी यांनी आणखी असे म्हटले आहे की;

१. हा महामंडळाच्या स्वत:च्या व्यावसायिक कामकाजाचा भाग नाही.

२. महामंडळास झालेले खर्च मग ते भांडवली असो किंवा महसुली असो महाराष्ट्र शासनाच्या वतीने झालेले आहेत.

मा. मुंबई उच्च न्यायालयाने पर्सिव्हल जोसेफ परेरा विरुध्द विशेष भूसंपादन अधिकारी आणि इतर यांच्या खटल्यातील रिट याचिका क्र.१२११ सन २००९ मध्ये असा निकाल दिलेला आहे की, महामंडळ महाराष्ट्र शासनाचा अभिकर्ता आहे.

या दृष्टीने, नवीन शहरांतील शिलकीवर प्रस्तुत वर्षासाठी आय कराकरीता कोणतीही तरतुद करण्यात आलेली नाही. त्याचप्रमाणे महामंडळ महाराष्ट्र शासनाचे अभिकर्ता म्हणुन काम करीत असल्यामुळे नवी मुंबई प्रकल्पाच्या शिलकीवर कोणतीही तरतुद करण्यात आलेली नाही आणि ही रक्कम महामंडळाच्या लेखा पुस्तकामध्ये महसूल म्हणून धरण्यात आलेली नाही.

खारपुटी (मॅन्ग्रोव्हज) वनस्पतीचे संरक्षण व पुनरुज्जीवन या संबंधातील माननीय उच्च न्यायालयाचे आदेश :-

मुंबई पर्यावरण कृती गट आणि इतर यांच्या खारपुटी वनस्पतीचे संरक्षण करण्यासाठी दाखल केलेल्या २००४ च्या रिट याचिका क्र.३२४६ मध्ये माननीय उच्च न्यायालयाने दिनांक ६ ऑक्टोबर, २००५ रोजी देण्यात आलेल्या आदेशामध्ये इतर गोष्टींबरोबर असा निर्देश दिलेला आहे की, खारपुटी (मॅन्ग्रोव्हज) वनस्पतींचा नाश व तोड करण्यावर पूर्णपणे बंदी असेल आणि जमिनीची मालकी कोणाचीही असो, सर्व खारपुटी वनस्पतींच्या चहु बाजुंनी ५० मीटर पर्यंत होत असलेली सर्व बांधकामे तात्काळ थांबविण्यात यावी. त्यानुसार मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांनी सिडकोसह सर्व पालिका यंत्रणांना माननीय उच्च न्यायालयाच्या आदेशांची साक्षेपीपणे अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले. या आदेशांची अंमलबजावणी केल्यामुळे २००८-२००९ या वर्षी चालू असलेल्या बव्हंश विकास कामांवर विपरीत परिणाम झालेला आहे. त्यामुळे ती कामे कार्यान्वित करण्यात आणखी प्रगती करता आली नाही.

महाराष्ट्र शासनाने सिडकोची नवीन नगर विकास प्राधिकरण म्हणून नियुक्ती केलेली आहे. पुढील विकासाची आणि पायाभूत सुविधांची कामे मा. उच्च न्यायालयाच्या आदेशामुळे सुरु करता आली नाहीत.

सिडकोने ही कामे पार पाडण्यासाठी आणि तांत्रिकदृष्ट्या ज्या ठिकाणी आवश्यक आहे, त्या ठिकाणची (मॅन्ग्रोव्हज) खारपुटीची झाडे हटविण्यासाठी परवानगी मिळावी अशी मा. न्यायालयाला विनंती केलेली आहे. त्यापैकी मा. उच्च न्यायालयाने काही अटी घालून ७२ कामांना परवानगी दिलेली आहे. परंतु अन्य कामांसाठी सक्षम प्राधिकरणांकडून अंतिम मान्यता मिळणे बाकी आहे.

उपकंपनीची माहिती :-

महाटुरिझम कॉर्पोरेशन लि.

वर्ष २००९-१० च्या दरम्यान सिडकोने महाराष्ट्र कॉर्पोरेशन लिमिटेड मधील रु.२,५५,०००/- इतक्या रकमेचे पूर्णपणे प्रदान केलेल्या प्रत्येकी १००/- रुपयांचे २५५० समभाग प्राप्त केलेले आहेत.

कंपनी अधिनियम १९५६ चे कलम २१२ च्या तरतुदीनुसार विवरणपत्र शहर आणि औद्योगिक विकास महामंडह महाराष्ट्र मर्यादित यांनी आपल्या मेसर्स महाटुरिझम कॉर्पोरेशन लिमिटेड या उपकंपनीमध्ये दिनांक ३१ मार्च २०१४ अनुसार धारण केलेले समभाग.

तपशिल	दिनांक ३१/३/२०१५ अनुसार रु.	दिनांक ३१/३/२०१४ अनुसार रु.
पूर्णपणे प्रदान केलेले प्रत्येकी रु.१००/- चे २५५० समभाग	२,५५,०००	२,५५,०००

संविधिमान्य लेखापरिक्षक:-

भारतीय नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी अहवाल वर्षासाठी महामंडळाचे सांविधिक लेखापरिक्षक म्हणून मेसर्स कैलाशचन्द जैन अँड कं., सनदी लेखापाल (नवी मुंबई आणि नागपूरसाठी), मेसर्स अशोक एस. झावर अॅन्ड कं., सनदी लेखापाल (नवीन नाशिकसाठी), मेसर्स आर. के. मुळे अँड कं., सनदी लेखापाल (नवीन औरंगाबादसाठी) आणि मेसर्स शिवाजीराव वीर अँड कं., सनदी लेखापाल (नवीन नांदेडसाठी) यांची नियुक्ती केली आहे. महामंडळाची २०१४-१५ या वर्षाची लेखांकने अंतिमरित्या निश्चित करण्याच्या कामी या सांविधिक लेखापरिक्षकांनी आम्हाला केलेल्या सहकार्याबद्दल व मार्गदर्शनाबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. सांविधिक लेखापरिक्षकांचा अहवाल आणि त्यातील मते नोंदविण्यात आलेली आहेत.

लेखापरिक्षकांचा अहवाल आणि नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा अंतिम अभिप्राय :-

संविधिमान्य लेखापरिक्षकांनी घातलेली प्रत्येक शर्त, आरक्षण किंवा प्रतिकुल अभिप्राय किंवा अस्विकार यांच्यावरील संचालक मंडळाने दिलेली स्पष्टीकरणे किंवा अभिप्राय परिशिष्ट एक अनुसार जोडण्यात आलेले आहेत.

नियंत्रक व महालेखापरिक्षकांनी महामंडळाच्या अहवालाच्या वार्षिक लेखांकनावर घातलेली प्रत्येक शर्त, आरक्षण किंवा प्रतिकुल अभिप्राय किंवा अस्विकार यांच्यावरील संचालक मंडळाने दिलेली स्पष्टीकरणे किंवा अभिप्राय परिशिष्ट दोन अनुसार जोडण्यात आलेले आहेत.

भाग भांडवल :-

मागील वार्षिक सर्वसाधारण सभेनंतर महामंडळाच्या भांडवली संस्थेमध्ये कोणताही बदल झालेला नसून ते रुपये ३,९५,००,०००/- इतके राहीलेले आहे व त्याची प्रत्येकी रु.१००/- इतक्या रकमेच्या ३,९५,०००/- सर्वसाधारण भागांमध्ये विभागणी झालेली आहे.

वार्षिक प्राप्तीचा सारांश :-

प्रपत्र क्र. एमजीटी-९ मधील वार्षिक प्राप्तीचा उतारा परिशिष्ट तीन अनुसार जोडण्यात आलेला आहे.

उर्जा संवर्धन, तंत्रज्ञान समावेशन आणि परकिय विनिमय प्राप्ती आणि निर्गम :-

उर्जा सवंर्धन आणि तंत्रज्ञान समावेशन हा महामंडळाच्या कामकाजाचा भाग नसल्यामुळे त्याबद्दलची माहीती देण्यात आलेली नाही.

परकिय प्राप्ती आणि निर्गम या संबंधातील माहीती लेखांकनाचा भाग असणाऱ्या टिपण्यांमध्ये देण्यात आलेली आहे.

निगम विषयक सामाजिक जबाबदारी (सी.एस.आर.) :-

संचालक मंडळाने कंपनी अधिनियम, २०१३ चे कलम १३५ आणि ठराव क्र. १०८९० अनुसार त्याअंतर्गत केलेली नियमावली या अन्वये ''सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी समिती'' ची स्थापना केलेली आहे. या समितीमध्ये खालील सदस्यांचा समावेश आहे.

अनु. क्र.	पदनाम	समितीमधील पद
१.	अध्यक्ष - सिडको	अध्यक्ष
२.	उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक - सिडको	सदस्य
३.	सह व्यवस्थापकीय संचालिका - सिडको	सदस्य
४.	एनएमएमसी - आयुक्त	सदस्य
५.	आयुक्त - कोकण प्रदेश	सदस्य
६.	पदसिद्ध संचालक	सदस्य
७.	पदसिद्ध संचालक	सदस्य

संचालक मंडळाच्या बैठका :-

२०१४-१५ या वर्षी संचालक मंडळाच्या १५ (पंधरा) बैठका झाल्या.

संचालक :-

महामंडळाच्या संस्थापन नियमावलीमध्ये समाविष्ट असलेल्या तरतुदीनुसार महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी नियुक्त केलेल्या पुढील व्यक्ती २०१४-२०१५ या वर्षी महामंडळाच्या मंडळावर संचालक होत्या. संचालकांपैकी कोणालाही आळीपाळीने निवृत्त व्हावे लागले नाही.

२०१४-१५ या वर्षी संचालक मंडळाच्या १५ (पंधरा) बैठका झाल्या. सन २०१४-२०१५ या वर्षात झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकींना पुढीलप्रमाणे संचालक उपस्थित होते.

अनु. क्र.	संचालकांचे नाव	नियुक्तीचा कालावधी		उपस्थित असलेल्या बैठकांची संख्या	झालेल्या बैठका
		पासुन	पर्यंत		
१.	श्री. प्रमोद हिन्दुराव	२९/०८/२०११	२५/११/२०१४	९	९
२.	श्री. संजय भाटीया, व्य. सं.	०४/०३/२०१३	पासून	१५	१५
३.	श्री. एम. के. श्रीवास्तव	२७/०६/२००८	०५/०१/२०१५	८	१२
४.	श्रीमती व्ही. राधा, सह व्य.सं.	२२/०५/२०१३	पासून	१४	१५
५.	श्री. युपीएस मदन	०५/०७/२०१४	पासून	२	१५
६.	श्री. एस.कै.सिंग	०५/०७/२०१४	०५/०१/२०१५	०	७
७.	श्री. आर. मोपलवार	०५/०७/२०१४	०१/०९/२०१५	७	१०
८.	श्री. ए. एल. जऱ्हाड	०५/०७/२०१४	०५/०१/२०१५	४	६
९.	श्री. एन.एन. कुमार	०५/०७/२०१४	०५/०१/२०१५	२	९
१०.	श्री. नामदेव भगत	३१/०५/२००८	२५/११/२०१४	९	९
११.	श्री. वसंत भोईर	२९/०८/२०११	२५/११/२०१४	९	९
१२.	श्री. आर. सी. घरत	२५/०८/२०१४	२५/११/२०१४	२	२
१३.	डॉ. नितिन करीर	०५/०१/२०१५	पासून	४	४
१४.	श्रीमती मनिषा पाटणकर-म्हैसकर	०५/०१/२०१५	पासून	०	४
१५.	श्री. दिनेश वाघमारे	०५/०१/२०१५	पासून	३	४
१६.	श्री. निरज बंसल	०५/०१/२०१५	०३/०९/२०१५	०	१
१७.	श्री. सुनिल केन्द्रेकर	आमंत्रित		७	१५

महामंडळाच्या व्यवस्थापनामध्ये उपरोक्त संचालकांनी केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाची मंडळ नोंद घेत आहे.

लेखा परिक्षा समिती :

संचालक मंडळाने कंपनी अधिनियम, २०१३ चे कलम १७७ आणि ठराव क्र.११४८६ बी अनुसार त्या अंतर्गत केलेली नियमावली या अन्वये "लेखापरिक्षा समिती" ची स्थापना केलेली आहे. या समितीमध्ये खालील सदस्यांचा समावेश आहे.

१.	अध्यक्ष, जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट (अध्यक्ष)	अध्यक्ष, लेखा परिक्षा समिती (पदसिध्द)
२.	महानगर आयुक्त, एमएमआरडी (सदस्य)	सदस्य (पदसिध्द)
३.	विभागीय आयुक्त, कोकण विभाग, महाराष्ट्र शासन	सदस्य (पदसिध्द)
४.	आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका	निमंत्रक (पदसिध्द)
५.	मुख्य लेखा अधिकारी	निमंत्रक (पदसिध्द)
६.	मुख्य दक्षता अधिकारी	निमंत्रित
७.	कंपनी सचिव	निमंत्रित
८.	वित्तिय सल्लागार	निमंत्रित
९.	सांविधिक लेखापरिक्षक	निमंत्रित
१०.	अंतर्गत लेखापरिक्षक	निमंत्रित

कर्ज, हमी किंवा गुंतवणुका यांचा तपशिल :-

कर्ज, हमी किंवा गुंतवणुका यासंबंधिचा तपशिल वित्तिय विवरणामध्ये प्रकट करण्यात आलेला आहे.

मे. मुंबई जेएनपीटी पोर्ट रोड कंपनी लिमिटेड आणि मे. महाराष्ट्र एअरपोर्ट डेवलपमेन्ट कंपनी लिमिटेड यांच्यामध्ये सन २००३-२००४ च्या दरम्यान अनुक्रमे रु.९०० लाख आणि रु.५०० लाख इतक्या रक्कमेच्या साधारण भागांच्या स्वरुपात दीर्घ मुदती गुंतवणूक करण्यात आली. सन २०१३-१४ पर्यंत मेसर्स नवी मुंबई स्पेशल इकॉनॉमिक झोन कंपनी लिमिटेडच्या साधारण भागांमध्ये रु.२०,०७०.५८ लाखाची गुंतवणूक करण्यात आली. सन २००९-१० च्या दरम्यान महामंडळाने व्हीआरसीसीएल, बीआरएससीसीएल आणि महाटुरिझम कॉर्पोरेशन लि. मध्ये अनुक्रमे रु.२.०० लाख, रु.४.०० लाख आणि रु.२.५५ लाख इतक्या रकमेची गुंतवणूक केली.

संबंधित पक्षकारांशी झालेल्या करारांचा किंवा व्यवस्थांचा तपशिल.

कंपनीने संबंधित पक्षकारांशी कंपन्या अधिनियम, २०१३ चे कलम १८८ उपकलम (१) अनुसार केलेले प्रत्येक करार किंवा व्यवस्था तसेच त्यातील तिसऱ्या परंतुकाअंतर्गत केलेले काही व्यवहार यांचा तपशिल दिनांक ५/६/२०१५ रोजीच्या अधिसूनचा क्र. जीएसआर ४६३ (ई) च्या दृष्टीने महामंडळाला लागू नाही.

सचिविय लेखापरिक्षा अहवाल :-

मेसर्स रागिणी चोकशी ॲण्ड कंपनी, कंपनी सचिव यांनी दिलेला सचिविय लेखापरिक्षा अहवाल परिशिष्ट चार अनुसार जोडण्यात आलेला आहे.

कंपनी सचिवाने सरावानुसार सचिविय लेखापरिक्षा अहवालामध्ये दिलेली प्रत्येक अर्हतेवरील आरक्षणावरील किंवा प्रतिकुल शेऱ्यावरील स्पष्टीकरणे किंवा अभिप्राय परिशिष्ट पाच अनुसार जोडण्यात आलेला आहे.

संचालकांच्या जबाबदारी विषयीचे निवेदन :-

कंपन्या अधिनियम २०१३ चे कलम १३४, उपकलम (३) चा खंड (क) मध्ये संदर्भित केलेल्या संचालकांच्या जबाबदारी विषयीच्या निवेदनामध्ये असे नमुद करण्यात येत आहे की:-

वार्षिक लेखांकने तयार करताना, आपल्या कंपनीने महत्त्वपूर्ण उल्लंघनांच्या संबंधातील योग्य स्पष्टीकरणे देताना प्रयोज्य लेखांकन मानकांचा अवलंब केला होता.

वित्तिय वर्षाच्या अखेरीस दिनांक ३१ मार्च, २०१३ रोजी असलेल्या स्थितीप्रमाणे आपल्या कंपनीच्या कामकाजाची आणि त्या कालावधीच्या नफ्याची आणि तोट्याची खरी व योग्य स्थिती दर्शविण्यासाठी रास्त व योग्य असतील अशा लेखांकन धोरणांचा संचालकांनी अवलंब केला होता आणि सातत्याने त्याचा वापर केला आहे आणि निर्णय व अंदाज वर्तविले आहेत.

आपल्या कंपनीच्या मत्ता सुरक्षित राखण्यासाठी आणि लबाडी व अन्य नियमबाह्य गोष्टी यांचा प्रतिबंध करण्यासाठी व शोध घेण्यासाठी संचालकांनी कंपनी अधिनियम, १९५६ च्या तरतुदीनुसार पुरेशा प्रमाणात लेखांकन अभिलेख ठेवण्याची योग्य व पुरेशी काळजी घेतलेली होती.

संचालकांनी वार्षिक लेखांकने चालू व्यवसाय संस्था तत्वावर तयार केलेली होती.

संचालकांनी सर्व प्रयोज्य कायद्यांच्या परंतुकांचे पालन होत आहे किंवा नाही आणि अशी यंत्रणा पुरेशी व प्रभावी आहे किंवा नाही याची खात्री बाळगण्यासाठी उचित यंत्रणेची योजना केलेली होती.

ऋणनिर्देश:-

आपले संचालक महाराष्ट्र शासनाच्या वेगवेगळ्या विभागांकडून व विशेषत: नगरविकास विभागाकडून सातत्याने जे सहाय्य व मार्गदर्शन लाभले त्याबद्दल त्यांचे ऋणी आहेत आणि महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभाग, वित्त उद्योग व इतर विभाग यांचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागरी विमानचालन मंत्री, रेल्वेमंत्री, आंतरराष्ट्रीय विमानतळ प्राधिकरण यांचे तसेच नवी मुंबई विशेष आर्थिक क्षेत्र, हुडको व अन्य संस्था यांचे अधिकारी व कर्मचारी यांनी जे सहाय्य केले त्याबद्दल संचालक त्यांचे आभारी आहेत.

महामंडळाच्या सर्व बँकर्सनी जे अर्थबळ सेवा आणि सहाय्य दिले त्याबद्दल संचालक त्यांचेही आभारी आहेत. भारतीय नियंत्रक व महालेखापरिक्षक, महालेखापाल (महाराष्ट्र) व त्यांचा कर्मचारी वर्ग आणि अंतर्गत लेखापरिक्षण संस्था यांनी ज्या सेवा, सहाय्य, मदत व सहकार्य दिले त्याबद्दल संचालक त्यांचे देखिल आभारी आहेत.

ज्यांची समर्पित वृत्ती, सहकार्य, सहाय्य व कौशल्य यामुळे कंपनीलाही वेगाने विकास करण्याचे उद्दिष्ट साध्य करणे शक्य झाले त्या सर्व स्तरांवरील कर्मचाऱ्यांचेही संचालक मंडळ आभारी आहे. संचालक मंडळाच्या प्रत्येक सदस्याचे त्याने दिलेल्या बहुमोल योगदानाबद्दल मी आभार मानू इच्छितो.

महामंडळाने नवी मुंबईमध्ये शक्य असेल तितक्या उत्तम दर्जाची शहर विकासाची कामे निर्माण करण्यासाठी ही प्रगती पथावरील वाटचाल पुढे चालू ठेवणे आणि रोजगार निर्मिती करण्याचे, गुंतवणूक वाढविण्याचे व नवी मुंबई शहराकडे लोकांना आकर्षित करण्याचे काम करीत राहण्याचे उद्दीष्ट समोर ठेवले आहे. आपल्या सहाय्यामुळे आम्हाला उज्वल भविष्याची उभारणी करणे शक्य झाले आहे. नवी मुंबई आणि नवीन शहरांची निर्मिती व जतन करण्यासाठी ज्यांनी आपल्या प्रयत्नांना साथ दिली त्या प्रत्येकाचे आम्ही आभारी आहोत.

संचालक मंडळ यांच्याकरीता व त्यांच्यावतीने

सही/-
अध्यक्ष

ठिकाण : मुंबई
दिनांक : २८/१०/२०१६
ठराव क्र. ११७३१ दि. २७/१०/२०१६

परिशिष्ट - एक

कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १३४ च्या आवश्यकतेनुसार दिनांक ३१मार्च, २०१५ रोजी संपलेल्या वर्षासाठी महामंडळाच्या लेखांकनाच्या संबंधातील लेखापरिक्षा अहवालाच्या अभिप्रायावरील स्पष्टीकरण

८.१ महाराष्ट्र शासनाने आपल्या दिनांक ०१-०१-२००५ रोजीच्या आदेशान्वये महामंडळाच्या दिनांक २६-०५-२००३ पासुन २८-१२-२००४ पर्यंतच्या कालावधीतील कामकाजाची कसुन चौकशी करण्यासाठी आणि विशेषत: नियम, विनियम आणि करार यांच्या विरूद्ध केलेल्या जमिन वाटपांच्या प्रकरणांमध्ये लक्ष घालण्यासाठी डॉ. के. शंकरन, अतिरिक्त मुख्य सचिव, नियोजन विभाग यांची नेमणुक केलेली असुन डॉ. डी. के. शंकरन यांनी आपला अहवाल सादर केलेला आहे. सदर अहवालाची प्रत आम्हाला आढावा घेण्यासाठी उपलब्ध झालेली नाही.

स्पष्टीकरण:- डॉ. डी.के. शंकरन कमिटीचा अहवाला संबंधित विभागाकडे उपलब्ध असून तो संविधिमान्य लेखापरिक्षकांना देण्यात येईल.

८.२ महाराष्ट्र शासनाने प्रथमेश को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी (प्रस्तावि) ला वाटप केलेल्या भूखंडाविषयी चौकशी करण्यासाठी नन्दलाल समितीची नेमणुक केलेली आहे आणि समितीने आपला अहवाल सादर केलेला आहे. सदर अहवालाची प्रत आम्हाला आढावा घेण्यासाठी उपलब्ध झालेली नाही.

स्पष्टीकरण :- नंदलाल कमिटीचा अहवाल संबंधित विभागाकडे उपलब्ध असून तो संविधिमान्य लेखापरिक्षकांना देण्यात येईल.

८.३ भाडेतत्त्वावरील मालमत्ता आणि भाडे करार यांच्या योग्य त्या अभिलेखा अभावी, नवी मुंबई प्रकल्प लेख्यांमध्ये भाडेपट्टा लेखांकनाची अचुकता निश्चित करता आली नाही.

स्पष्टीकरण:- या बाबतीत कृती अहवाल घेण्यात आलेला आहे.

६.४ रेल्वे अधिभाराच्या लेखांकनाच्या संबंधातील पुष्टी देणारे आवश्यक दस्तऐवज आणि माहिती यांच्या अभावी आम्हाला मध्य रेल्वे आणि पश्चिम रेल्वेकडून तिकिटे, कुपन्स आणि स्मार्ट कार्ड यांच्या विक्रीतुन प्राप्त झालेल्या आणि प्राप्त होण्याजोग्या अधिभाराच्या अचुकतेवर अभिप्राय देता येत नाही आणि त्याची पडताळणी करता येत नाही.

स्पष्टीकरण:- या बाबतीत कृती कार्यक्रम घेण्यात आलेला आहे.

८.५ नवी मुंबई प्रकल्प लेख्यांच्या बाबतीत जमा केलेल्या हस्तांतरण शुल्काशी संबंधित कागदपत्रे आम्हाला पडताळणी करण्यासाठी सादर करण्याची विनंती करून देखिल बहुतेक कागदपत्रे उपलब्ध करून दिलेली नाहीत. अशा अभिलेखांच्या अभावी, आम्हाला हस्तांतरण शुल्काच्या उचित लेखांकनावर अभिप्राय देता येत नाही.

स्पष्टीकरण:- मान्यतेसाठी नोंद घेतली.

८.६ औरंगाबाद युनिटने दिलेल्या माहितीनुसार, सिडकोने सेक्टर एन-११ (मटण बाजार) मधील दुकाने आणि टपऱ्या यांची विक्री करण्यासाठी कोणतेही प्रयत्न केलेले नाहीत आणि मागील कित्येक वर्षांपासून विक्री न झालेली दुकाने आणि टपऱ्या यानुसार हे लेखांकन दर्शविण्यात आलेले आहे.

स्पष्टीकरण :- मान्यतेसाठी नोंद घेतली.

८.७ प्रस्तुत वर्षी औरंगाबाद, नाशिक, नान्देड आणि म्हैसमाळ शाखांमध्ये कोणत्याही दुकानांची / स्टॉल्सची विक्री झालेली नाही. तसेच प्रस्तुत वर्षी औरंगाबाद आणि नान्देडमध्ये विविध गृहनिर्माण योजनांमधील पुर्ण झालेल्या सदनिकांची विक्री झालेली नाही.

स्पष्टीकरण :- मान्यतेसाठी नोंद घेतली.

८.८ चालु मत्ता आणि दायित्वांखाली मेळ न बसलेल्या आणि मागील वर्षांमध्ये देण्यात आलेल्या कर्ज आणि अग्रिम रकमांच्या असमायोजित खात्याच्या बाबतीत आणि वसुली न झालेल्या अग्रिम रकमांच्या बाबतीत अनुसूची क्र. १८ च्या टिप क्र. ३, ४ आणि ५ वर लक्ष वेधण्यात आलेले आहे.

स्पष्टीकरण :- मत्ता आणि दायित्वे यांच्या अंतर्गत येणाऱ्या विविध लेखांकनांचा पुनर्मेळ घालण्यात आलेला आहे. तथापि सन १९९० आणि त्या पुर्वीच्या कालावधीशी संबंधित काही जुन्या बाबी असल्यामुळे या बाबींचा मेळ घालण्यासाठी पुढील कार्यवाही करण्यात आलेली आहे.

